शुक्रवार, १० सप्टेंबर २०२१
वर्ष १४ ◆ अंक ५५
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## आता ३१ डिसेंबरपर्यंत इन्कम टॅक्स भरता येणार!



**नवी दिल्ली :** इन्कम टॅक्स रिटर्न करण्यासाठी सरकारने पुन्हा एकदा मुदतवाढ दिली आहे. यापूर्वी इन्कम टॅक्स रिटर्नसाठी ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. आता सीबीडीटीने पुन्हा याला मुदतवाढ दिली असून, आता ३१ डिसेंबरपर्यंत इन्कम टॅक्स रिटर्न फाईल करता येणार आहे. यापूर्वी इन्कम टॅक्स पोर्टलमधील तांत्रिक समस्यांमुळे ही तारीख वाढवली जाऊ शकते, असा अंदाज व्यक्त करण्यात येत होता. असेसमेंट इयर २०२१-२२ साठी इन्कम टॅक्स रिटर्न करण्याची अखेरची तारीख सुरुवातीला ३१ जुलै होती. त्यानंतर ती वाढवून ३० सप्टेंबर करण्यात आली. आता पुन्हा एकदा त्याला मुदतवाढ देण्यात आली असून ती ३१ डिसेंबर २०२१ करण्यात आली आहे, असे निवेदन अर्थ मंत्रालयाद्वारे जारी करण्यात आले आहे.

अंतरंग
'आणखी एक कॅबिनेट मंत्री भ्रष्टाचाऱ्यांच्या यादीत'/२
विकासकामांचा निधी रायगड जि.प.ने अडविला/५
टी-२० वर्ल्डकपसाठी टीम इंडियाची घोषणा/६

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मागणीला यश

# कळंबोली सर्कल घेणार मोकळा श्वास

■ केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या अधिकाऱ्यांना सूचना

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल-उरण परिसरात असलेले विविध महत्त्वाकांक्षी प्रकल्प आणि त्या पार्श्वभूमीवर अत्यंत वर्दळीचे असलेले कळंबोली सर्कल विकसित करण्याच्या हालचाली सुरू करण्यात आल्या आहेत. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मागणीची दखल घेऊन केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांनी कळंबोली सर्कलचा विस्तार करण्याच्या दृष्टिकोनातून मंगळवारी (दि. ७) बैठक आयोजित केली होती. कळंबोली सर्कलच्या विकासासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचा सल्लागार नेमा, अशी सूचना त्यांनी सिडको आणि इतर यंत्रणांना दिली आहे.



मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली ते पनवेल-उरण-जेएनपीटीकडे जाणाऱ्या महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहनांची रहदारी असते. पनवेल-उरण ते मुंबई-ठाणेकडून ही वाहतूक जेएनपीटीकडे ये-जा करीत असताना अवजड कंटेनर, प्रवासी वाहतूक कळंबोली एमजीएम सर्कल येथून २४ तास मार्गक्रमण करीत असतात, त्यामुळे कळंबोली सर्कल हे ठिकाण रहदारीचे आणि महत्त्वाचे जंक्शन आहे. या कारणास्तव, वाहतूक कोंडीची समस्या नेहमीच कळंबोली एमजीएम परिसरात भेडसावते आणि कधी कधी तर तासन्तास 'ट्रॅफिक जाम' होतो, ज्यामुळे मोठ्या प्रमाणात इंधन आणि वेळ वाया जातो. त्यामुळे वाहतूक कोंडीतून पनवेलकरांची मुक्तता करण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना विनंती केली होती. त्या विनंतीनुसार मंगळवारी दिल्लीत बैठक झाली.

जेएनपीटी आंतरराष्ट्रीय बंदरामुळे उरण, पनवेल परिसरात अवजड वाहतूक ही डोकेदुखी ठरली आहे. याचा सर्वाधिक परिणाम वेगवेगळे रस्ते एकत्र येणाऱ्या कळंबोली सर्कलवर झाला आहे. मुंबईहून पुणे, पनवेल, अलिबाग, गोवा दिशेने जाणारी वाहतूक ठाणे आणि मुंब्र्याहून जेएनपीटी, पुणे, अलिबागच्या दिशेने जाणारी वाहतूक या सगळ्यांसोबत स्थानिक वाहनचालकांना दररोज ये-जा करण्यासाठी कळंबोली सर्कल पार करावे लागते. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून विमाने उड्डाण घेऊ लागल्यानंतर मुंबईतील 'एअर ट्रॅफिक' कमी होईल, मात्र नवी मुंबईतील रस्त्यावरील कोंडी वाढू नये, या पार्श्वभूमीवर कळंबोली वाहतूक सर्कल विकसित करणे आवश्यक असणार आहे. जेएनपीटी, सिडको आणि राष्ट्रीय रस्ते विकास प्राधिकरणाने एकत्र येऊन प्रस्तावित नवी मुंबई विमानतळाच्या सीमाभागातील रस्ते विकसित करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. यामधील पॅकेज ४पर्यंतची कामे पूर्ण झाली असून पॅकेज ५मध्ये कळंबोली सर्कल आणि विमानतळाच्या वहाळ बाजूकडील 'एग्झिट'वर रोटरी प्रकारचे चक्राकार बेट तयार करण्याचे प्रस्तावित आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांनी केलेल्या मागणीची दखल घेऊन नितीन गडकरी यांनी मंगळवारी दिल्लीत बैठक आयोजित केली होती.

या बैठकीला उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी, सिडको, जेएनपीटी आणि एनएचएआयचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. सध्या असलेल्या सल्लागारांसोबत आंतरराष्ट्रीय दर्जाचे सल्लागार घेऊन पुढील २० वर्षे पुन्हा नूतनीकरणाची गरज लागणार नाही, असे नियोजन करण्याच्या सूचना गडकरी यांनी उपस्थितांना दिल्या. कळंबोली येथे बेट विकसित करताना सिडकोच्या जागेची गरज लागणार असल्यामुळे सिडकोने जागा यासाठी राखीव ठेवावी, अशा सूचनादेखील दिल्या.

या बातमीचा व्हिडीओ पाहण्यासाठी हा क्यूआर कोड स्कॅन करा



*दिल्लीत झालेल्या बैठकीत आम्ही कळंबोली सर्कलच्या कोंडीची कहाणी सांगण्यापूर्वीच ना. नितीन गडकरी यांनी अधिकाऱ्यांना सर्कलवर होणाऱ्या कोंडीची माहिती दिली. त्यामुळे आम्हाला माहिती सांगण्याची गरजच पडली नाही.*

**- प्रशांत ठाकूर, आमदार, पनवेल**

### रोटरी प्रकारच्या सर्कलचे नियोजन

जेएनपीटी बंदराकडे जाणारी अवजड वाहतूक, विमानतळावरून थेट पुण्याकडे जाणारी वाहतूक एकमेकांना अडथळा न करता थेट मुंबई-पुणे एक्स्प्रेसवर जाता येईल, यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचे 'रोटरी' प्रकारचे सर्कल विकसित करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यात आणखी भविष्याचे नियोजन करून आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सल्लागाराचा सल्ला घेऊन पुन्हा बैठक घेतली जाणार आहे.

### गणपती बाप्पा मोरया...!



**पनवेल : विघ्नहर्त्या गणेशाचे आगमन आज घरोघरी झाले. कोरोनाचे सावट असले तरी गणेशभक्तांनी निर्बंधांचे पालन करीत लाडक्या गणरायाला वाजतगाजत घरी आणले आणि कोरोनाचे संकट लवकर दूर करण्याची प्रार्थना केली.** (छाया : लक्ष्मण ठाकूर)

## नवीन पनवेलमध्ये होणार आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट प्रशिक्षण केंद्र

### महापालिकेच्या स्थायी समितीकडून प्रस्ताव मंजूर



या बातमीचा व्हिडीओ पाहण्यासाठी हा क्यूआर कोड स्कॅन करा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेची स्थायी समितीची ऑनलाईन पद्धतीने सभा स्थायी समिती अध्यक्ष संतोष शेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी (दि. ९) झाली. या सभेत पनवेल महापालिका हद्दीतील नवीन पनवेलमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट प्रशिक्षण केंद्र विकसित करण्यासाठीची मंजुरी देण्यात आली. त्याचबरोबर ४६ विषय मांडण्यात आले होते. त्यातील ४४ विषयांना मंजुरी देण्यात आली, तर दोन विषय नामंजूर करण्यात आले. या वेळी सभागृह नेते परेश ठाकूर, नगरसेवक प्रकाश बिनेदार, मुकीद काझी, अजय बहिरा, प्रवीण पाटील आदींसह अधिकारी उपस्थित होते.

या वेळी अन्य विषयांमध्ये पनवेल मनपाकरिता कीटकनाशके व रासायनिक जंतुनाशके पुरविणे, पनवेल शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याची उंची वाढविणे व त्या परिसराचे सुशोभीकरण, **(पान २ वर..)**



पनवेल : भाजप ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष एकनाथ देशेकर आणि तालुका चिटणीस नामदेव जमदाडे यांनी प्रकाशित केलेल्या आरती संग्रहाचे प्रकाशन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले. या वेळी भाजप ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, वाकडीच्या सरपंच कुंदा पवार, उपसरपंच मंगेश पाटील, माजी सरपंच नितीन काठावले, द्वारकानाथ बोलाडे, अंकुश पाटील, अनंता पाटील, बाळू पवार आदी उपस्थित होते.

राम प्रहर

**शनिवारी अंक नाही**

श्रीगणेश चतुर्थीनिमित्त 'राम प्रहर'च्या कार्यालयास शुक्रवारी सुटी असल्यामुळे शनिवारी (दि. ११ सप्टेंबर) अंक प्रसिद्ध होणार नाही. याची वाचक, जाहिरातदार, वितरक, एजंट, प्रतिनिधी व हितचिंतकांनी नोंद घ्यावी.

**गणेशोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा!**

-मुख्य संपादक









# आणखी एक कॅबिनेट मंत्री भ्रष्टाचाऱ्यांच्या यादीत -सोमय्या

**पुणे : प्रतिनिधी**

राज्याचे परिवहन मंत्री अनिल परब यांचे दापोलीच्या समुद्रकिनारी असलेले अनधिकृत रिसॉर्ट पाडण्यात यावे, याबाबत लोकायुक्तांकडे शपथपत्र दाखल करण्याची राज्य सरकारने मान्यता दिली आहे. त्यामुळे अनधिकृत बांधकाम करूनही परब मंत्रिमंडळात कसे राहू शकतात? असा प्रश्न भाजप नेते किरीट सोमय्या यांनी केला, तर आता भ्रष्टाचाराच्या यादीत आणखी एक नाव पुढे आले आहे. ती व्यक्ती कॅबिनेट मंत्री असून, पुढील आठवड्यात ते नाव जाहीर करणार असल्याचा इशारा सोमय्या यांनी दिला.

येथील पत्रकार भवनात गुरुवारी (दि. ९) आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी खासदार भावना गवळी यांना निर्दोष असल्याचे प्रमाणपत्र दिले आणि मुख्यमंत्री ठाकरे यांनी माझ्यावर कितीही हल्ले करायला लावले तरी महाराष्ट्राला भ्रष्टाचारमुक्त करण्याचे आणि घोटाळेबाज सरकारला ठिकाणावर आणण्याचे काम सुरूच राहणार, असा इशारा सोमय्या यांनी दिला.



ठाकरे यांच्या ११ मंत्री आणि नेत्यांची यादी जाहीर केली होती. बारावा खेळाडू जितेंद्र आव्हाड हे असून, आणखी एक राखीव खेळाडू सापडला आहे. ते नाव पुढील आठवड्यात जाहीर करणार आहे. ती व्यक्ती राज्य सरकारच्या कॅबिनेटमधील असल्याचा खळबळजनक आरोप सोमय्या यांनी केला. छगन भुजबळ यांची न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली. त्यावर सोमय्या यांनी 'आगे आगे देखो होता है क्या,' अशी प्रतिक्रिया दिली. महापौर मुरलीधर मोहोळ, खासदार गिरीश बापट, आमदार माधुरी मिसाळ आदी या वेळी उपस्थित होते.

खासदार गवळी यांनी २५ कोटी रुपये रिसोड अर्बन सहकारी पतसंस्थेतून रोख काढले आहेत. तरीही 'इडी' का चौकशी करते म्हणून विचारले जाते. गवळींनी बालाजी पार्टीकल बोर्ड सहकारी साखर कारखान्यात ५५ कोटींचा घोटाळा केल्याचा आरोप सोमय्या यांनी केला. '४४ कोटी केंद्राच्या एनसीडीसी आणि ११ कोटी स्टेट बँकेकडून घेतले. हा कारखाना सुरू होताना त्यांनी त्यांच्याच भावना ग्रो कारखान्याला २५ लाखांत विकला.'असे सोमय्या म्हणाले.

## तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते डेरवलीतील गणेश विसर्जन घाटाचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उरणचे आमदार महेश बालदी यांच्या स्थानिक विकास निधीतून करण्यात आलेल्या पनवेल तालुक्यातील डेरवली येथील गणपती विर्सजन घाटाचे काम पूर्ण झाले आहे. या विर्सजन घाटाचे उद्घाटन भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते गुरुवारी (दि. ९) करण्यात आले.

आमदार महेश बालदी यांच्या माध्यमातून मतदारसंघात विविध विकासकामे सुरू आहेत. सर्वत्र साजऱ्या होणाऱ्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गणरायाच्या विर्सजनासाठी डेरवली येथे आमदार महेश बालदी यांच्या स्थानिक विकास निधीतून गणपती विसर्जन घाट बांधण्यात आला आहे. डेरवली ग्रामस्थांनी गावात सुसज्ज गणपती विसर्जन घाट व्हावा यासाठी आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्याकडे मागणी केली होती. त्यानुसार हे काम पूर्णत्वास आले आहे.

या विसर्जन घाटाच्या उद्घाटनाचा कार्यक्रम पळस्पे विभागीय सरचिटणीस रवींद्र शेळके यांच्या पुढाकाराने झाला. या कार्यक्रमाला भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, कोन ग्रामपंचायत सरपंच नीलेश म्हात्रे, युवा कार्यकर्ते सुनील गोवंडी, गाव अध्यक्ष विकास शेळके, पळस्पे विभागीय सरचिटणीस रवींद्र शेळके, संतोष गाताडे, सुरेश पाटील, ज्येष्ठ नेते हरिश्चंद्र पाटील, ग्रामपंचायत सदस्य महेश पाटील, महेश शेंडे, विवेक शेळके, गोपाळ पाटील, संदीप पाटील, पंढरीनाथ भोपी, रूपेश शेळके यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते.



## ड्रेनेजचे तुटलेले झाकण बदलले



**पनवेल : वार्ताहर**

शहरातील चिंतामणी हॉल आणि ओझा हॉस्पिटल समोरील ड्रेनेजचे झाकण तुटले होते. या रस्त्यावरील रहदारी बघता एखादी दुर्घटना होऊ नये म्हणून काही दक्ष नागरिकांनी नगरसेवक विक्रांत पाटील यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यांनी तत्काळ ड्रेनेजचे तुटलेले झाकण बदलून घेतले.

**नगरसेवक विक्रांत पाटील यांची तत्परता**

विक्रांत पाटील हे प्रभागातील नागरिकांच्या समस्या सोडविण्याकडे कायम तत्पर असतात. ड्रेनेजची ही समस्या नागरिकांनी त्यांना सांगितल्यावर त्यांनी विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन तत्काळ महानगरपालिकेला पत्र दिले व अधिकाऱ्यांशी संपर्क साधला, तसेच संबंधित कॉन्ट्रॅक्टरकडून ड्रेनेजचे नवीन झाकण लावून घेण्यास सांगितले.

## एकनाथ देशेकर व नामदेव जमदाडे यांच्या आरती संग्रहाला शुभेच्छा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गणेशोत्सवानिमित्त भाजप ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष एकनाथ देशेकर आणि तालुका चिटणीस नामदेव जमदाडे यांच्या प्रकाशित आरती संग्रहाला भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत व महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांनी गुरुवारी (दि. ९) शुभेच्छा दिल्या.

भाजप मध्यवर्ती कार्यालयात झालेल्या कार्यक्रमाला भाजपचे तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, पनवेल पंचायत समिती सदस्य भुपेंद्र पाटील, वाकडी ग्रामपंचायतीच्या सरपंच कुंदा पवार, उसर्लीचे माजी सरपंच नितीन काठावले, द्वारकानाथ बोलाडे, खानावचे उपसरपंच अनंता पाटील, वाकडी ग्रामपंचायतीचे उपसरपंच मंगेश पाटील, माजी उपसरपंच अरुण पाटील, महिला मोर्चा तालुका चिटणीस शिल्पा म्हात्रे, बाळू पवार, अंकुश पाटील, विश्वनाथ पाटील, शुभ पाटील आदी उपस्थित होते.

## बेशिस्त पार्किंगला लगाम घालण्याची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१९मधील बेशिस्तपणे होत असलेल्या पार्किंगला लगाम घालण्याची मागणी नगरसेविका दर्शना भोईर यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी पनवेलच्या वाहतूक पोलीस निरीक्षकांना लेखी निवेदन दिले आहे.



**नगरसेविका दर्शना भोईर यांचे वाहतूक पोलिसांना निवेदन**

पनवेल महानगरपालिका हद्दीतील बस डेपोसमोर, लाईन आळी, बाजारपेठ क्षेत्र, शिवाजी चौक, गावदेवी मंदिर परिसर, आगरी समाज हॉल, महात्मा फुले रोड, जुने पोस्ट ऑफीस, भाजप कार्यालय, पंचरत्न सर्कल, या ठिकाणी असलेल्या रस्त्याच्या दुतर्फा बेशिस्तपणे वाहन लावण्यात येत असून यामुळे तासन्तास वाहतुकीचा खोळंबा होत आहे. यामुळे या परिसरातील नागरिक त्रस्त असून यावर तातडीने उपाययोजना करण्याबाबत मागणी करण्यात येत आहे. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क. १९मधील होत असलेल्या बेशिस्त पार्किंगला लगाम घालण्याच्या दृष्टीने तातडीने उपाययोजना कराव्यात, असे नगरसेविका भोईर यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

पान १ वरून

## नवीन पनवेलमध्ये होणार आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट प्रशिक्षण केंद्र

महापालिकेच्या मालकीच्या इमारतीची देखभाल व दुरुस्ती वार्षिक तत्त्वावर करणे, प्रभाग समिती 'ड' प्रभाग क्रमांक २०मधील तक्का गाव येथे मलनिस्सारण वाहिन्या टाकणे, अंतर्गत गटाराचे बांधकाम करणे, प्रभाग समिती 'ड' प्रभाग क्रमांक १९मधील मच्छी मार्केट व पार्किंगमधील रस्ता कॉंक्रिटीकरण करणे व पार्किंग क्षेत्रातील जमिनीची उंची वाढविणे, प्रभाग समिती 'ड'मधील विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणे, मलनिस्सारण वाहिन्या टाकणे, गटार बांधण्याचे काम करणे, प्रभाग समिती 'क'मधील विविध ठिकाणचे अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे, प्रभाग समिती 'ब'मधील रोडपाली बौद्धवाडी येथील कासाडी नदीलगतच्या दगडाचे पिचिंग करणे या कामांचे विषय मंजूर करण्यात आले.

तसेच पनवेल महापालिका हद्दीतील प्रभाग समिती 'अ' प्रभाग क्रमांक १मधील रोहिंजण व किरवली गावातील रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण करणे, प्रभाग क्रमांक ३मधील तळोजे मजकुर व घोट गाव येथील रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण व गटार बांधकाम करणे, धरणा गाव व धरणा कॅम्प गावातील रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण व गटार बनविणे, नागझरी गावातील रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण करणे, प्रभाग क्रमांक ३मधील पापडीचा पाडा येथे रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण व गटर बांधणे, तसेच खुटूकबांधन आणि ईनामपुरी येथील रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण करणे, पनवेल महापालिका हद्दीतील प्रभाग समिती 'ड'मधील प्रभाग क्रमांक १८मधील छत्रपती संभाजी महाराज मैदान विकसित करण्याच्या विषयास मंजुरी देण्यात आली.

कोरोना विषाणूचा वाढता प्रादूर्भाव रोखण्यासाठी व प्रतिबंधात्मक उपाययोजना व उपचारासाठी टेस्ट किट खरेदी करणे आणि कोव्हिड-१९ परिस्थितीचा सामना करण्यासाठी आपत्कालीन परिस्थितीच्या वेळी आवश्यक असणाऱ्या औषधी साहित्याच्या ई-निविदांच्या दरांना मान्यता मिळण्याबाबत विषय मंजूर करण्यात आला. या सभेत दोन विषयांना नामंजुरी देण्यात आली असून यामध्ये पनवेल महापालिका मालकीच्या १४ एमएलडी क्षमतेच्या सांडपाणी प्रक्रिया प्लँटची निगा, दुरुस्ती व देखभाल करणे आणि पनवेल महापालिका हद्दीत केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत सन २०१५-२०१६, २०१६-२०१७ अंतर्गत हरित क्षेत्र विकसित केलेल्या, वृक्षलागवड व लॉन या झालेल्या कामांची निगा, दुरुस्ती, देखभाल करण्याबाबतच्या विषयांचा समावेश आहे.



पनवेल : शहरातील 'घंटा' डिश गोळा आणि रबडी फालुदा या विष्णू रतनदास वैष्णव यांच्या आईसक्रीम पार्लरचे उद्घाटन भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते गुरुवारी करण्यात आले. या वेळी नगरसेवक राजू सोनी, गोपीनाथ भगत, नगरसेविका दर्शना भोईर, प्रभाग क्रमांक १९ अध्यक्ष पवन सोनी, महिला मोर्चा शहर उपाध्यक्ष सुहासिनी केकाणे, श्रीगणेश दास, रतन दास, राजू दास, शंकर दास, विष्णू दास यांच्यासह करंजाडे सिरवी समाजातील नागरिक उपस्थित होते.



पनवेल : भाजप कार्यकर्ते रवींद्र म्हात्रे यांना वाढदिवसानिमित्त तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर, तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, पं. स. सदस्य भुपेंद्र पाटील, महिला मोर्चा तालुका चिटणीस शिल्पा म्हात्रे, माजी ग्रामपंचायत सदस्य संतोष गाताडे, सोनू कांबळे, युवा नेते शुभ पाटील आदी उपस्थित होते.



उलवे नोड : भाजप महिला मोर्चा शहर अध्यक्ष निकिता खारकर यांच्या प्रयत्नांमुळे सेक्टर २४ येथील आरोग्य केंद्रात कोरोना प्रतिबंधात्मक लसीकरण केंद्र सुरू झाले आहे. या वेळी वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे, सदस्य गीता ठाकूर, उलवा ग्रामपंचायतीचे उपसरपंच जगदीश खारकर, भाजपचे गव्हाण विभाग सरचिटणीस निलेश खारकर उपस्थित होते. या लसीकरण केंद्रावर कोविशिल्ड या लसीचे डोस देण्यात येणार आहेत.




पनवेल : क्राऊड २१ या संस्थेतर्फे कोरोना काळात गोरगरिबांची सेवा केल्याबद्दल महिला सुरक्षा संघटनेच्या रायगड जिल्हाध्यक्ष नीता माळी यांचा कोरोना योद्धा म्हणून प्रमाणपत्र देऊन गुरुवारी सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमात माळी यांच्या हस्ते अन्य कोरोना योद्ध्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. या वेळी संस्थेचे सभासद व अन्य उपस्थित होते.



पनवेल : भाजप ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष एकनाथ देशेकर व तालुका चिटणीस नामदेव जमदाडे यांनी प्रकाशित केलेला आरती संग्रह तालुका वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र दौंडकर यांना देण्यात आला. या वेळी वाकडीच्या सरपंच कुंदा पवार, माजी सरपंच नामदेव जमदाडे, पत्रकार मयूर तांबडे, बाळू पवार उपस्थित होते.

**कोरोना लसीकरणासंदर्भात नागरिकांसाठी सूचना**

पनवेल महापालिका क्षेत्रातील कोणत्याच लसीकरण केंद्रावर शुक्रवार, दि. १० सप्टेंबर २०२१ रोजी कोविड प्रतिबंधक लसीकरण होणार नाही, याची नागरिकांनी नोंद घ्यावी.

## बेस्टमधील कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी भाजपचा पुढाकार

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

बेस्टमधील अभिलेखकांच्या मागण्यांसाठी नुकतीच दादर येथील भाजपच्या वसंत स्मृती कार्यालयांमध्ये एक बैठक घेण्यात आली. बेस्टमधील कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी भाजपच्या वतीने पुढाकार घेण्यात आला आहे.

बेस्ट उपक्रमामधील अभिलेखक या पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना पाच दिवसाचा आठवडा लागू करावा किंवा कराराप्रमाणे चालू बेसिकप्रमाणे प्रो-रेटा देण्याच्या मागणीबाबत कोणीही सकारात्मक प्रयत्न केले नाहीत. अभिलेखकांची मागणी रास्त व योग्य असल्यामुळे त्यांच्या पाठीशी भाजप बेस्ट कामगार संघ व बेस्ट समिती सदस्य सुनील गणाचार्य हे ठामपणे उभे राहिले आहेत.

बेस्टमधील सर्व अभिलेखकांना एकत्रित करण्याचे काम संघाचे उपाध्यक्ष बबन बारगजे यांनी केले. सर्व अभिलेखकांना




मार्गदर्शन करताना सुनील गणाचार्य यांनी सांगितले की, तुमच्या या मागणीसाठी भाजपचे सर्व सहा कमिटी सदस्य व विरोधी पक्षातील सदस्य यांना एकत्रित करून तुमचा मुद्दा मी कमिटी मीटिंगमध्ये घेतो. यासाठी तुम्ही सर्वांनी मला साथ द्या व जे जे पेपर तुम्हाला चर्चेसाठी लागतील ते सर्व जमा करा, अशा सूचना दिल्या. गणेशोत्सवानंतर या सर्व अभिलेखकांचा एकत्रित मेळावा घेऊन त्यांच्या सर्व मागण्यासाठी महाव्यवस्थापकांबरोबर बैठक घेऊन त्यांना तुमचा विषय समजावून सांगू. ते नक्कीच आपला विषय ऐकून घेतील व यावर तोडगा काढतील, अशी आशा व्यक्त केली.

भाजप बेस्ट कामगार संघाचे अध्यक्ष व महाराष्ट्र प्रवक्ते गणेश हाके यांनी सांगितले की, समान कामाला समान वेतन मिळाले पाहिजे व तुम्ही करत असलेले काम हे प्रशासकीय काम असल्यामुळे व तुम्ही जास्त वेळ काम करत असल्यामुळे तुम्हाला त्याचा मोबदला मिळालाच पाहिजे. त्यासाठी भाजप निःस्वार्थीपणे तुमच्या पाठीशी राहील, असे आश्वासन दिले.

या बैठकीसाठी कामगारांचे प्रतिनिधी म्हणून रवींद्र पानवलकर, एस. आर. मिश्रा, आर. एन. खेडेकर, पुरुषोत्तम कदम, ए. बी. चंपानेरी, बी. जी. शिर्के, तसेच बेस्ट उपक्रमामधील सर्व विभागाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# नवी मुंबईत विक्रमी लसीकरण

## एका दिवसात ३८,०८६ जणांना लसमात्रा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

जानेवारीपासून शहरात कोरोना लसीकरण सुरू झाल्यानंतर आतापर्यंतचे एका दिवसातील सर्वाधिक लसीकरण बुधवारी (दि. ८) करण्यात आले. दिवसभरात ३८,०८६ जणांना लस देण्यात आली असून यात पालिकेच्या केंद्रांवर ३४,११२ तर खाजगी रुग्णालयात ३९७४ जणांना लस देण्यात आली. यापूर्वी एका दिवसात सर्वाधिक २४,८०० जणांना लस देण्यात आली होती.

मंगळवारी नवी मुंबई महापालिकेला कोविशिल्डच्या ४५,६०० लसमात्रा मिळाल्या होत्या. त्यामुळे बुधवारी १८ ते ४४ वयोगटासाठी पहिल्या मात्रेचे शंभर केंद्रांवर मेगा लसीकरण आयोजित केले होते. यात ४१ हजार जणांना लस देण्याचे नियोजन करण्यात आले होते.

एकीकडे पाऊस तर दुसरीकडे दोन दिवसांवर आलेला गणेशोत्सव यामुळे लस घेतल्यानंतर ताप येईल, यामुळे काही जणांनी लस घेतली नाही. तरीदेखील बुधवारी झालेले लसीकरण सर्वाधिक झाल्याची माहिती पालिका प्रशासनाने दिली आहे. पालिकेने शहरात १०० केंद्रांवर लसीकरणाचे नियोजन करण्यात आले होते. त्याला चांगला प्रतिसाद मिळाला. आगामी काळात मोठ्या प्रमाणात लस प्राप्त करण्यासाठी पालिका प्रयत्नशील असून जास्तीत जास्त मेगा लसीकरण करण्यासाठी पालिका लसउपलब्धतेनुसार तयार असल्याची माहिती पालिका आयुक्त बांगर यांनी दिली.



शहराच्या १५ लाख लोकसंख्येपैकी १० लाख ८० हजार नागरिक लसीकरणासाठी पात्र आहेत. आजच्या लसीकरणामुळे नऊ लाखांहून अधिक नागरिकांना पहिल्या लसमात्रेचे सुरक्षाकवच मिळाले आहे. तिसऱ्या लाटेपूर्वी लसपात्र असलेल्या १०० टक्के नागरिकांना किमान एक मात्रा देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

मोठ्या प्रमाणावर लस उपलब्ध झाल्याने महानगरपालिकेची चार रुग्णालये, २२ नागरी आरोग्य केंद्र, तसेच विष्णुदास भावे नाट्यगृह येथे जम्बो सेंटरसह इतर विभागांतील शाळा, समाजमंदिरे अशा एकूण १०० लसीकरण केंद्रांचे नियोजन करण्यात आले होते. सर्वच ठिकाणी १८ ते ४४ वयोगटातील नागरिकांच्या लसीकरणाला उत्तम प्रतिसाद मिळाला.

या वेळी १८ ते ४४ वयोगटातील ३३ हजार ६०२ नागरिकांनी पहिला डोस, तसेच २६८ नागरिकांनी दुसरा डोस घेतला. त्याचप्रमाणे ४५ ते ६० वर्षावरील ८८ नागरिकांनी पहिला तसेच १०३ नागरिकांनी दुसरा डोस घेतला, तसेच ६० वर्षावरील २२ नागरिकांनी पहिला व २९ नागरिकांनी दुसरा डोस घेतला. अशा प्रकारे एकूण ३३७१३ नागरिकांनी पहिला व ४०० नागरिकांनी दुसरा डोस घेतला. याशिवाय खाजगी रुग्णालयातील लसीकरण केंद्रांवरही १०१९ नागरिकांनी पहिला व २९५५ नागरिकांनी दुसरा डोस घेतला. आजच्या दिवसात नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात नवी मुंबई महानगरपालिकेची १०० केंद्रे व खाजगी रूग्णालयातील केंद्रे मिळून ३८०८६ इतके लसीकरण झाले.

# पावसामुळे छोट्या व्यावसायिकांचे नुकसान

## फळे, फुले, पूजेच्या साहित्यावर पाणी



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोरोनामुळे लहान व्यावसायिक डबघाईला आलेले असताना बुधवारी व गुरुवारी झालेल्या जोरदार पावसाने त्यांचे प्रचंड नुकसान केले. गणेशोत्सव व हरतालिका असल्याने बाजारात फळे, फुले, पूजेचे साहित्य व्यावसायिकांनी विक्रीसाठी ठेवले होते, मात्र पावसामुळे ते पाण्यात भिजून गेले. त्यात ग्राहकही फिरकला नसल्याने नफा तर सोडाच भांडवलही निघाले नाही.

गणपती आगमन आणि हरतालिका या सलग दोन दिवसांच्या सणात कोट्यवधींची उलाढाल दरवर्षी होत असते. हरतालिका पूजेला लागणाऱ्या वनस्पती आणि फुले याचा व्यवसाय करणारे या काळात दिवसभरात किमान ४० ते ५० हजार निव्वळ नफा कमावतात. त्यामुळे शिथिल झालेले निर्बंध पाहता त्यांनी मोठ्या उत्साहाने आपली दुकाने थाटली होती. भांडवलापोटी पैसा कसातरी उभारला होता. यातून काही पैसे पदरात पडतील, अशी आशा त्यांना होती, मात्र पावसाने त्यावर पाणी फेरले.

ऐन व्यवसाय होण्याच्या वेळेत पाऊस सुरू झाला. तो इतका प्रचंड होता की या फेरीवाल्यांचे यात मोठे नुकसान झाले. त्यात ग्राहकही न आल्याने माल पडून होता. त्यामुळे ४० ते ८० रुपयांपर्यंत विकला जाणारा वाटा पावसात भिजल्याने मागेल त्या किमतीत तो विकावा लागला. तर उर्वरित माल फेकून द्यावा लागल्याची व्यथा व्यावसायिकांनी व्यक्त केली.

**होत्याचे नव्हते झाले. चार पैसे जास्त मिळतील म्हणून थेट गावातून माल आणला. सगळे नुकसान झाले. मल्टी नॅशनल कंपन्यांचे नुकसान झाल्यावर राज्य सरकार त्यांचे कोट्यवधी रुपयांचे कर्ज माफ करते. आम्हीही माणसेच आहोत. आमच्याकडेही पाहा!**

**–इंदुबाई पाटील, व्यापारी, घणसोली**

**काल पहाटे चढ्या भावात आणलेला सर्व माल रात्री व आजच्या पावसात भिजला. त्यात जो माल भिजला नाही त्या फुलांच्या पाकळ्या गळून पडत असल्याने कोणी हातही लावायला तयार नाही.**

**–सदानंद नार्वेकर, व्यापारी, वाशी सेक्टर ९ मार्केट**

# आमदार महेश बालदी यांच्या हस्ते आरती संग्रहाचे प्रकाशन

**उरण : विषेश प्रतिनिधी, वार्ताहर, प्रतिनिधी**

गणेशोत्सवानिमित्त व मी उरणकर सामाजिक व सांस्कृतिक प्रतिष्ठानला पाच वर्ष पूर्ण झाल्याबद्दल संस्थेच्या वतीने आरती संग्रह प्रकाशित करण्यात आला आहे. या आरती संग्रहाचे प्रकाशन आमदार महेश बालदी यांच्या हस्ते गुरुवारी करण्यात आले.

संस्थेला पाच वर्ष पूर्ण झाल्यानिमित्ताने गणपती आगमनालाच या संग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. या वेळी भाजप तालुका अध्यक्ष रवी भोईर, प्रतिष्ठानचे पदाधिकारी उपस्थित होते. या आरती संग्रहाचे घरोघरी वाटप करणार असल्याचे प्रतिष्ठानचे अध्यक्ष विशाल विजय पाटेकर यांनी सांगितले. संस्थेच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले जात असून संस्थेला सर्वतोपरी मदत करणार असल्याचे सांगत संस्थेच्या पुढील वाटचालीसाठी आमदार महेश बालदी यांनी शुभेच्छा दिल्या.



# महिला पोलीस शिपाईने दिली सहकाऱ्याच्या हत्येची सुपारी

## आरोपी अटकेत

**पनवेल : वार्ताहर**

मुंबई पोलीस दलात कार्यरत असणाऱ्या एका महिला पोलीस शिपाईनेच तिच्या पोलीस सहकार्याबरोबर झालेल्या वादातून त्याची हत्या करण्याची सुपारी देऊन त्याची हत्या घडवून आणल्याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी तिघांना ताब्यात घेतले. त्यांच्या अटकेमुळे अपघात झालेला गुन्हा हा दाखविला असतानाही मयत व्यक्तीच्या कुटुंबीयांनी व्यक्त केलेल्या संशयामुळे खऱ्या गुन्ह्याला वाचा फुटली आहे.

पनवेल रेल्वे स्टेशन ते मालधक्का जाणाऱ्या रस्त्यावर भगत चाळीसमोर मयत शिवाजी माधवराव सानप (वय ५४) कार्यरत मुंबई पोलीस यांना कोणत्या तरी अज्ञात वाहनाने धडक मारल्याने ते गंभीररीत्या जखमी झाले होते व त्यात त्यांचा मृत्यू झाला होता. प्राथमिक स्वरूपात मोटार अपघात म्हणून गुन्हा नोंदविण्यात आला होता, परंतु या घटनेसंदर्भात सानप यांच्या कुटुंबीयांनी संशय व्यक्त केला. त्यानुसार पोलिसांच्या पथकाने या गुन्ह्याची सखोल चौकशी करण्यास सुरुवात केली.

घटनास्थळ, परिसर व सीसीटीव्ही फुटेज, मोबाइल फोन, आलेले फोन, केलेले फोन व इतर तांत्रिक तपासाचा आधार घेऊन व त्यांच्या कुटुंबीयांनी दिलेल्या माहितीच्या आधारे शिवाजी सानप हे रेल्वे स्थानकात उतरून पायी जात होते. या वेळी आरोपी विशाल जाधव व गणेश चव्हाण ऊर्फ मुदावथ याने त्याच्या ताब्यातील नॅनो गाडीने जाणीवपूर्वक जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने त्यांना जबर ठोकर मारून गंभीर जखमा करून त्यांचा खून केल्याचे निष्पन्न झाले आहे. या गुन्ह्यात वापरलेली नॅनो कार सुद्धा पोलिसांनी हस्तगत केली आहे. सखोल तपासामध्ये शिवाजी सानप हे जेथे कार्यरत होते. त्या ठिकाणी महिला पोलीस शिपाई शितल पानसरे या सुद्धा कार्यरत होत्या. त्यांच्या दोघांमध्ये ओळख होती, परंतु त्यांच्यात झालेल्या वादाचा मनात राग धरून सूड घेण्याच्या उद्देशाने आरोपी शितल पानसरे हिने तिच्या घरात घरकाम करणारा विशाल जाधव व त्याचा मित्र गणेश चव्हाण यांना पैसे देऊन त्यांची मदत घेऊन जीवे ठार मारण्याचा कट रचून तो यशस्वी केला, परंतु पोलिसांनी सखोल चौकशीद्वारे यांना ताब्यात घेतले आहे. याबाबत अजूनही काही आरोपी असण्याची शक्यता असल्याने त्या दृष्टीने पनवेल शहर पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# शिक्षक दिनी गुरुजनांचा सन्मान

## नगरसेवक विक्रांत पाटील यांचा उपक्रम

**पनवेल : वार्ताहर**

भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस भारतात शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. शिक्षक दिनाचे औचित्य साधून नगरसेवक विक्रांत पाटील यांनी प्रभागातील गुरुजनांच्या घरी जाऊन त्यांचा आदर सत्कार केला व त्यांचे आशीर्वाद घेतले.

नगरसेवक विक्रांत पाटील नेहमीच अशा अनोख्या उपक्रमांच्या माध्यमांतून प्रभागातील जनतेपर्यंत पोहचण्यास तत्पर असतात. गेली वर्षोनुवर्षे शिक्षक अनेक विद्यार्थी घडवीत आले आहेत. त्यांचे हे कार्य अत्यंत मोलाचे व देशाच्या उन्नतीसाठी महत्त्वाचे असे राष्ट्रकार्य आहे. त्यामुळे त्यांचा सन्मान करण्याचे अहोभाग्य मिळणे हे माझे भाग्यच आहे, असे या उपक्रमाबद्दल बोलताना विक्रांत पाटील यांनी मत व्यक्त केले. विक्रांत पाटील यांनी केलेल्या या सन्मानाने सर्व शिक्षक भारावून गेले व त्यांच्या डोळ्यांमध्ये आनंदाश्रू आले. विक्रांत पाटील यांनी शिक्षक दिनाच्या या उपक्रमाच्या माध्यमातून तमाम शिक्षकांच्या सेवेला सलाम केला.



# उरणमधील नवीन बसेससंदर्भात भाजप महिलांतर्फे आगार प्रमुखांस निवेदन

**उरण : वार्ताहर**

उरण आगारात दाखल झालेल्या नवीन बसेससंदर्भात भाजप तालुका महिला अध्यक्ष ॲड. राणी सुरज म्हात्रे यांच्या वतीने उरण आगार प्रमुख सतीश मालचे यांना गुरुवारी (दि. ९) निवेदन देण्यात आले.

उरण आगारात ज्या काही नवीन बसेस दाखल झाल्या आहेत. त्या बसेसमध्ये आसन व्यवस्था किती आहे. त्यामध्ये महिला व अपंगासाठी आरक्षित व्यवस्था आहे का, असल्यास किती आसने आरक्षित आहेत? तसेच आरक्षणाच्या पाट्या सीटला किंवा बसमध्ये लावल्या आहेत की नाही? या संदर्भात संपूर्ण माहिती द्यावी, असे निवेदनात नमूद केले आहे. निवेदन देतेवेळी तालुका सरचिटणीस निर्मला घरत, महिला शहर अध्यक्ष संपूर्णा थळी, जासई विभागीय अध्यक्ष विश्रांती घरत, गोवठणे गाव अध्यक्ष विश्रांती म्हात्रे, भाजप पूर्व विभाग अध्यक्ष सुगंधा कोळी आदी उपस्थित होते.





**पनवेल : गणेशोत्सवानिमित्त पत्रकार वसीम पटेल यांनी भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांना शुभेच्छा दिल्या.**

# मोठे धामणीतून दारूचा साठा जप्त

**पनवेल :** पनवेल तालुक्यातील मोठे धामणी परिसरातून देशी दारूचा साठा जप्त करण्यात आला आहे. मोठी धामणी येथे मोठ्या प्रमाणात देशी दारूच्या प्लॅस्टीकच्या बाटल्या (किंमत जवळपास सहा हजार रुपये) एका घराच्या बाजूला असलेल्या मोकळ्या जागेत ठेवली असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र दौंडकर यांना मिळाली. त्यानुसार त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांच्या आदींच्या पथकाने त्या ठिकाणी छापा मारून दारूचा साठा जप्त केला आहे.

# खारघरमध्ये महिलांसाठी विविध स्पर्धा

## भाजपच्या श्रावण सरी कार्यक्रमास प्रतिसाद

**खारघर : प्रतिनिधी**

प्रदेशातून आलेल्या सूचनेनुसार श्रावण सरी हा कार्यक्रम खारघर तळोजा महिला मोर्चा अध्यक्ष वनिता पाटील यांच्या अध्यक्षतेखाली खारघर येथे मंगळवारी (दि. ७) आयोजित करण्यात आला होता.

यामध्ये महिलांची निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. निबंध स्पर्धेत प्रथम कल्पना भोसले, द्वितीय भारती बांदेकर आणि अर्चना घोरपडे तर तृतीय वर्षा शिरस्कर यांनी पटकावला. वक्तृत्व स्पर्धेत दीपा कुलकर्णी आणि माधवी वरूनकर यांनी मी शिवबाची जिजाऊ या विषयावर तडफदार असे आपले विचार मांडले. त्यांच्या कलागुणांनाही या वेळी गौरविण्यात आले.

या कार्यक्रमात समर्थ महिला मंडळ आणि गौऱ्या गणपती महिला मंडळ यांनी खूप सुरेख असे मंगळागौर नृत्य साजरे केले. सुमित्रा चव्हाण, देवकी भिसे, विजया ठाकूर, मनीषा तोतला यांनी सुरेल गाण्यांची मैफल जमवली होती आणि या कार्यक्रमाच्या अंती सर्वच महिलांनी मंगळागौर नृत्याचा आनंद लुटला.





या कार्यक्रमाला भाजप महिला मोर्चा रायगड जिल्हा उपाध्यक्ष संध्या शारबिद्रे, खारघर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, सरचिटणीस दीपक शिंदे यांचे मोलाचे मार्गदर्शन महिलांना लाभले. सूत्रसंचालन महिला मोर्चा सरचिटणीस साधना पवार यांनी केले. या वेळी रायगड जिल्हा मिडीया सहसंयोजिका मोना अडवाणी, उपाध्यक्षा आशा बोरसे, चिटणीस मधुमिता जेना, प्रभाग अध्यक्षा आशा शेडगे, नीलम विसपुते, माजी सैनिक सेल अध्यक्ष निर्मला यादव प्रभाग ४ सरचिटणीस सुशीला शर्मा, ओबीसी सेलच्या सीमा खडसे, सेक्टर ११ अध्यक्षा अश्विनी भुवड, विजयालक्ष्मी सरकार, प्रिया दळवी, शकुंतला लवटे, सविता सांगळे, प्रज्ञा मुकुटकर, शिल्पा गायकवाड, राजश्री नायडू, विजया पाटील, शितल मोरे, शोभा देसाई, सुमित्रा शर्मा संतोष चौधरी, राज शर्मा, गीता स्वामी, सुलोचना शर्मा, विभा विशनोई, सीमा गुप्ता, तुलसी हलवाई, सपना पांडे आदी उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान मीडिया संयोजिका (खारघर) शोभा मिश्रा यांनी महिलांचे छायाचित्र काढण्यास विशेष मेहनत घेतली.

# कोकण विभागात राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोकण विभागातील सर्व प्रशासकीय स्तरामध्ये २० ऑगस्टपासून राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा राबविण्याबाबत कोकण विभाग उपायुक्त मनोज रानडे यांनी आवाहन केले आहे.

प्रशासन लोकाभिमुख करणे, त्यात निर्णयक्षमता आणणे आणि सर्वांच्या सहकार्यातून उत्तम प्रशासन कार्यान्वित करणे यासाठी शासन निर्णय २ ऑगस्ट २००२ नुसार २० ऑगस्ट ते २ ऑक्टोबर या कालावधीत राज्यस्तरावर, तसेच तालुका, जिल्हा, विभागीय स्तरावर व महानगरपालिका स्तरावर राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान राबविण्यात येते. या अभियान व स्पर्धेत जास्तीत जास्त शासकीय कार्यालयांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन मनोज रानडे यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये केले आहे.

# जेएनपीटीतर्फे सामाजिक संस्थांना पावणेदहा कोटींचा निधी मंजूर

**उरण : विशेष प्रतिनिधी**

राज्यातील विविध जिल्ह्यांतील अनेक सामाजिक संस्थांनी सीएसआर फंडातून सामाजिक कार्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. यापैकी जेएनपीटीने सोमवारी झालेल्या बोर्ड ऑफ ट्रस्टींच्या बैठकीत १८ सामाजिक संस्थाच्या कामांसाठी सीएसआर फंडातून सुमारे पावणे दहा कोटी रुपयांचा निधी म्हणजे नऊ कोटी ६४ लाख ६१ हजार ३३ रुपयांचा निधी मंजूर केला आहे. यामध्ये उरण तालुक्यातील सहा संस्थांचा समावेश आहे.

यामध्ये उरण तालुक्यातील ठिकठिकाणी शुद्ध पाणीपुरवठा योजनेसाठी एटीएम मशीन्स बसविण्यासाठी एलएएचएस प्रतिष्ठान (ठाणे) ९८ लाख २३ हजार ५००, महिला आर्थिक विकास महामंडळ (रायगड) ४७ लाख ५१ हजार, सेव्ह दीड चिल्ड्रन्स इंडिया (उरण) २५ लाख २२ हजार ५२०, लक्ष्मण नारायण भोईर शैक्षणिक संस्था (नवीन शेवा, उरण) १० लाख सहा हजार ८०, उरण तालुका प्रकल्पग्रस्त शैक्षणिक व सामाजिक विकास संस्था, उरण एक कोटी ८० लाख, द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसिएशन (उरण) १४ लाख ९८ हजार ५००, लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट ४४ लाख ७१ हजार ८०९, महाराष्ट्र इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी सपोर्ट सेंटर–३४ लाख २८ हजार ५७५, अंजुमन इस्लाम स्कूल कन्स्ट्रक्शन (श्रीवर्धन), ५० लाख, ग्रामपंचायत ऑफिस वडवली (पालघर) ५० लाख, अभिनव जनसेवा असोसिएशन पालघर ४४ लाख ४६ हजार २२२, अण्णा मित्र फाउंडेशन जळगाव व सातारा २४ लाख ९९ हजार ९५८, श्री मारुती देव सार्वजनिक ट्रस्ट (महाड) ५१ लाख ६० हजार, काका साहेब चितळे स्मृती केंद्र जळगाव व नाशिक ३३ लाख ५६ हजार ६७४, भगीनी निवेदिता ग्रामीण विज्ञान निकेतन (कर्जत, रायगड) ५६ लाख २९ हजार ६२३, बरोबर ग्लोबल फाऊंडेशन ९४ लाख ५६ हजार, मिराबो ग्लोबल फाउंडेशन ५० लाख तीन हजार २००, सादजवान ग्रामीण विकास संस्था ५४ लाख १३ हजार १७३ आदी संस्थांचा समावेश आहे. बोर्ड ऑफ ट्रस्टींच्या बैठकीत जरी निधी मंजूर झाला असला तरी केंद्रीय नौकानयन मंत्रालयाच्या मान्यतेनंतरच निधी उपलब्ध होणार आहे.

## संपादकीय

# आरोग्याचा श्रीगणेशा

काळोख्या रात्री अवघड वाटेवर मिणमिणत्या प्रकाशात एकेक पाऊल सावधपणे पुढे टाकत वाटचाल करावी तसे सारे जग तिळातिळाने पुढे सरकत असल्याचा भास होतो. अद्यापही अनिश्चिततापूर्णच भासणाऱ्या वातावरणात पुन्हा एकदा गणपती बाप्पा आपल्या घरी आला आहे. त्याचे श्रद्धापूर्वक स्वागत करायलाच हवे. संकटी रक्षी शरण तुला मी, गणपती बाप्पा मोरया या ओळी त्यामुळेच आता अधिक प्रत्ययकारी वाटतात.

**गणेशोत्सवाच्या तोंडावर सरकारने नवीन नियमावली जाहीर करून कोरोनाविषयक निर्बंध थोडे कडक केले आहेत. त्यामुळे गणेशोत्सवाचा झगमगाट यंदाही थोडा उणावणार हे नक्की. गेल्या वर्षी भाद्रपदामध्ये गणपती बाप्पा आले होते, तेव्हा कोरोनाची पहिली लाट शिखराला पोहोचली होती हे विसरता येणार नाही. यंदा दुसरी लाट किंचित ओसरल्याचे दिसत असले तरी बेसावध राहून चालणार नाही. पुरेशी आणि योग्य काळजी घेऊन बाप्पाचे स्वागत करायला काहीच हरकत नाही. कोरोनाच्या तिसऱ्या लाटेसाठी सज्ज होत असल्याची हाकाटी सरकार आणि प्रशासन कितीही उठवत असले तरी सज्ज व्हायचे आहे ते आपल्यालाच, हे लोकांनी लक्षात घ्यायला हवे. तिसरी लाट येऊच नये म्हणून सर्वांनीच एकत्रित प्रयत्न करायला हवेत. तशी बुद्धी गणरायाने सर्वांना द्यावी ही प्रार्थना आहे. सरकारने जाहीर केलेल्या नियमावलीचा अवघा भर सार्वजनिक गणेशोत्सव मर्यादित स्वरूपात साजरा करण्यावर दिसतो. प्रत्यक्षात राज्यात घरोघरी गणेशोत्सव साजरा करणाऱ्यांची संख्याही मोठी असल्याने ठिकठिकाणच्या बाजारपेठांमध्ये गेले काही दिवस मोठी गर्दी होताना दिसते आहे. गेल्या वर्षी या सुमारास परिस्थिती अधिक बिकट असल्यामुळे बहुतेकांनी खूपच आटोपशीर स्वरूपात घरगुती गणेशोत्सव साजरा केला होता. त्यामुळेच की काय, या वेळी लोकांचा उत्साह उधाणला आहे. खरेदीपासून एकमेकांना निमंत्रणे देण्यापर्यंत बहुतेकांचे आसपासच्या कोरोना संबंधित परिस्थितीकडे दुर्लक्ष होते आहे. अर्थात, सरकारकडून जाहीर होणारी कोरोनासंबंधी आकडेवारीही कधी चाचण्या वाढवल्या, कधी चाचण्या कमी केल्या याने प्रभावित होत असल्यामुळे लोक सध्या त्याकडे फारसे लक्ष देईनासे झाले आहेत. निर्बंधांइतकीच खरे तर जनजागृतीची गरज आहे. नेमक्या कुठल्या गोष्टी टाळाव्यात, लसीकरणानंतरही लागण कशी होऊ शकते, लस घेतलेलेही इतरांकरिता संसर्गाचे वाहक असू शकतात आदी बाबींची माहिती अद्याप सर्वसामान्यांपर्यंत फारशी पोहोचलेलीच नाही. बाकीचे सारे व्यवहार सुरू झाल्यामुळे बाहेर पडणारे लोक सणासुदीच्या दिवसांत घरी बसून राहतील अशी अपेक्षा करणेच अव्यवहार्य आहे. गणेशोत्सव साजरा करताना स्वत:च्या आणि इतरांच्या आरोग्याच्या दृष्टीने लोकांनी काय दक्षता घ्यावी यासंदर्भात जागरूकता निर्माण करण्याची जबाबदारीही आपलीच आहे हे सरकारने ध्यानात घेण्याची गरज आहे. निव्वळ सण साजरे करण्यावर निर्बंध घालण्याऐवजी अन्य प्रलंबित निर्णयही सरकारने घ्यावेत. तशी बुद्धी गणरायानेच राज्यातील सत्ताधाऱ्यांना द्यावी असे साकडे आता लोकांनीच घालण्याची गरज आहे. गेली जवळपास दीड वर्षे शाळा आणि महाविद्यालये बव्हंशी बंद आहेत. शिक्षणविषयक बहुतेक सारे व्यवहार इंटरनेटच्या माध्यमातून ऑनलाइन सुरू असले तरी त्यालाही काही मर्यादा आहेत. पुन्हा एकवार शाळेची घंटा घणघणावी आणि विद्यालयांच्या प्रांगणांमध्ये गणवेषातील बाळगोपाळांचा किलबिलाट व्हावा असे सर्वांनाच वाटते. भक्तांची ही इच्छा बुद्धिदात्या श्रीगणेशाने लवकर पूर्ण करावी हीच त्याच्या चरणी प्रार्थना.**

# गणेशमूर्तींबाबत ठोस धोरण हवे



**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

गणेशमूर्ती बनविण्याबाबत शासनाचे ठोस धोरण नाही. त्यामुळे गणपती कारखानदारांचे नुकसान होत आहे. शासन शाडूमातीच्या मूर्ती बनविण्यास सांगते तर गणेशभक्तांची मागणी प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींना असते. शाडूमातीच्या मूर्तींना मागणी नसल्यामुळे पेण परिसरातील गणपती कारखान्यांमध्ये मातीच्या लाखो मूर्ती पडून आहेत. राज्य सरकारने आता घरगुती गणेश मूर्तीसाठी दोन फुटांची तर सार्वजनिक मंडळांसाठी चार फुटांची गणेशमूर्ती असावी, अशी अट घातली आहे. त्यामुळे मोठ्या गणेशमूर्तीही पडून आहेत. या मोठ्या मूर्त्यांचे तसेच मातीच्या मूर्तींचे करायचे काय, हा प्रश्नही कारखानदारांना भेडसावत आहे. गणेमूर्तीबाबत ठोस धारेण नसल्यामुळे गणपती कारखानदारांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले आहे.

रायगड जिल्ह्यातील पेण शहर हे गणपतीच्या मूर्तींचे माहेरघर म्हणून आळखले जाते. पेण शहराबरोबरच आजूबाजूच्या गावांमध्येदेखील मोठ्या प्रमाणावर गणपतींचे कारखाने आहेत. सुमारे ४० लाख मूर्ती पेण तालुक्यात तयार केल्या जातात. यातून ३०० कोटी रुपयांची उलाढाल होते. गणेशमूर्ती पर्यावरणपूरक असावी, म्हणून या मूर्ती शाडूमातीच्या बनवाव्यात, असे शासनातर्फे सांगण्यात आले होते. त्यानुसार मातीच्या मूर्ती बनविण्यात आल्या होत्या. शासन शाडूमातीच्या मूर्ती बनविण्यास सांगत असले तरी गणेश भक्तांची पसंती प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींला असल्यामुळे मातीच्या ४० टक्के मूर्ती कारखान्यांत पडून राहिल्या आहेत. त्यामुळे गणपती कारखानदारांचे आर्थिक नुकसान झाले आहे.

गेल्या वर्षी करोना आणि टाळेबंदीचा मोठा फटका या व्यवसायाला बसला होता. तर या वर्षी गणेश मूर्तीबाबत शासनाचे स्पष्ट धोरण नसल्याचा फटका गणेशमूर्ती व्यवसायाला बसला आहे. केंद्रीय पर्यावरण विभागाने दोन वर्षापूर्वी प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेशमूर्तींवर बंदी घातली होती. गणेश मूर्तिकारांच्या मागणीनंतर ही बंदी शिथिल करण्यात आली. या वर्षीही प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती असाव्यात की नसाव्यात याबाबत स्पष्ट निर्देश नव्हते. त्यामुळे शाडूची माती आणि प्लास्टर ऑफ पॅरिस अशा दोन्ही प्रकारच्या गणेशमूर्ती पेणमध्ये तयार करण्यात आल्या, मात्र यंदा मातीच्या गणेश मूर्ती करण्यावर मूर्तीकारांनी जास्त भर दिला होता. मातीच्या गणेशमूर्तींना बाजारातून अपेक्षित उठाव मिळाला नाही. त्यामुळे मूर्तिकार अडचणीत सापडले आहे.

प्लास्टरच्या मूर्तींना मागणी आहे. पण मूर्त्या उपलब्ध नाहीत. मातीच्या मूर्ती उपलब्ध आहेत, पण ग्राहक मिळत नाहीत अशी गत मूर्तिकारांची झाली आहे. मातीच्या ४० टक्के मूर्त्या पडून आहेत. त्यामुळे मूर्तिकार आर्थिक अडचणीत सापडले आहेत. गणपतीचे कारखानदार बँकांमधून कर्ज काढतात. या कर्जांची परतफेड गणेशोत्सवानंतर केली जात असते. मात्र या वर्षी मोठ्या प्रमाणात मातीच्या मूर्ती शिल्लक राहिल्याने या कर्जाची परतफेड वेळेत कशी करायची हा प्रश्न त्यांना भेडसावत आहे.

मातीच्या मूर्ती वजनाला जड असतात. त्या रेखीव नसतात. या मूर्ती महागही असतात. या उलट प्लास्टर ऑफ पॅरिसची मूर्ती वजनाने हलकी असते. ती रेखीव असते, स्वस्त असते. वाहतुकीला सोपी पडते. त्यामुळे गणेभक्तांचा मागणी प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तीला जास्त आहे. गणेशभक्त प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तीला पसंती देत असल्यामुळे मागील वर्षी शिल्लक राहिलेल्या प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती यंदा विकल्या गेल्या. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती दुसऱ्या वर्षीदेखील वापरता येतात, परंतु मातीच्या मूर्ती दुसऱ्या वर्षी वापरता येत नाहीत. या मूर्तींचे विसर्जनच करावे लागते. त्यामुळे गणपती कारखानदारांचे आर्थिक नुकसान होते.

घरगुती गणपतींच्या मूर्तीची कमाल उंची किती असावी, तसेच सार्वजनिक गणपतीच्या मूर्तीची उंची किती असावी. मूर्ती मातीच्या बनवाव्यात की, प्लास्टर ऑफ पॅरिसच्या बनवाव्यात, याबात शासनाने एक धोरण ठरवून ते निश्चित करावे. म्हणजे आम्ही तशा मूर्ती तयार करू, असे गणपती कारखानदारांचे म्हणणे आहे, ते योग्य आहे. दरवर्षी मतीच्या मूर्ती बनवून त्या शिल्लक राहणार असतील तर त्याचा उपयोग काय. त्यामुळे गणपती कारखानदारांचे नुकसानच होणार आहे.

पेण शहरात गणेशमूर्ती बनवणारे सुमारे १५० मूर्तिकार कार्यरत आहे. तर जोहे, हमरापूर, वडखळ आणि कामार्ले परिसरात गणेशमूर्ती बनवणाऱ्या ४५० हून अधिक कार्यशाळा आहेत. यातून दरवर्षी सुमारे ३५ लाख गणेशमूर्त्या तयार केल्या जातात. ज्या देश–विदेशातही पाठवल्या जातात. या मूर्तिकला व्यवसायातून दरवर्षी २५० कोटींची उलाढाल होत असते. या व्यवसायावर सुमारे २५ हजार कुटुंबांची उपजीविका चालते. हा व्यवसाय आत इंडस्ट्री झाली आहे. त्यातून अनेकांना वर्षभराचा रोजगार मिळत आहे. शासनाने कोणतीही योजना न राबवता ही इंडस्ट्री तयार झाली आहे, परंतु शासनाचे याबाबत ठोस धोरण ठरत नाही. त्यामुळे कारखानदारांमध्ये संभ्रम आहे. एकतर प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींना परवागनगी द्यावी किंवा शाडूमातीच्या गणपती मूर्तींना परवानगी द्यावी. शासनाने या व्यवसायासाठी धोरण नक्की करायला हवे.



# वरसोली ग्रामस्थांचा महावितरण अधिकाऱ्यांना घेराव

**अलिबाग : प्रतिनिधी**

तालुक्यातील वरसोली ग्रामपंचायत हद्दीतील वीजपुरवठ्याच्या समस्या सोडाव्यात या मागणीसाठी वरसोली ग्रामपंचायतीचे पदाधिकारी व सदस्यांनी बुधवारी (दि. ८) महावितरणच्या चेंढरे येथील कार्यालयात जाऊन तेथील अभियंत्यांना घेराव घातला.



वरसोली या ग्रामपंचायत हद्दीतील विद्यूत सेवा सुरळीत सुरू ठेवण्यासाठी महावितरण कंपनीचे दोन कर्मचारी आहेत. गेल्या अनेक वर्षापासून या दोन कर्मचाऱ्यांच्या भरोशावर महावितरणचे कामकाज सुरु होते. मात्र काही दिवसांपूर्वी या दोन्ही कर्मचाऱ्यांची बदली करण्यात आली. त्यांच्या जागी अन्य कर्मचारी नियुक्त न केल्याने वरसोली परिसरातील वीजपुरवठ्यात अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. ऐन गणेशोत्सवात विद्युत कर्मचारी उपलब्ध नसल्याने गैरसोय होण्याची भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे संतप्त झालेल्या ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांसह सदस्यांनी बुधवारी चेंढरे येथील अतिरिक्त कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय गाठले.

वरसोली हद्दीत महावितरण कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी, अशी मागणी या वेळी करण्यात आली. त्याची दखल घेत तात्पुरत्या स्वरूपात कर्मचारी देण्यात येईल, असे आश्वासन अतिरिक्त कार्यकारी अभियंता सादेकपाशा इनामदार यांनी दिले. सरपंच प्रमिला भाटकर, उपसरपंच मिलिंद कवळे, सदस्य सुरेश घरत, हर्षल नाईक, संध्या खोत, नमिता माळवी, प्रियंका गुंजाळ, साधना तांडेल, संजीवनी कवळे आदी पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

# खोपोलीतील विसर्जन घाटांची दुरुस्ती



(छाया : अरूण नलावडे)

**खालापूर : प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर खोपोली नगर परिषदेने शहरातील मुख्य रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे काम सुरू केले आहे. तसेच विविध प्रभागातील गणेश विर्सजन घाटाची दुरुस्ती व संरक्षण कठडे उभारण्याचे काम युद्धपातळीवर सुरू केले आहे. मुख्याधिकारी गणेश शेटे आणि खोपोलीचे पोलीस निरीक्षक शिरीष पवार यांनी या कामांची नुकतीच पाहणी केली. या वेळी उपमुख्याधिकारी गौतम भगळ व नगर परिषदेचे इतर अधिकारी उपस्थित होते.

खोपोली शहरात एकूण ८६ किमी लांबीचे रस्ते आहेत. या रस्त्यांवर काही ठिकाणी मुसळधार पावसामुळे खड्डे पडले आहेत. नगर परिषदेने या रस्त्यांची डागडुजी करण्याचे काम हाती घेतले असून खडी, ग्रीटचा वापर करून खड्डे भरण्याचे काम सुरू केले आहे.

पाताळगंगा नदीवरील गगनगिरी आश्रम, रहाटवडे सिध्दार्थनगर, मुळगांव, शिळफाटा, ताकई येथील विर्सजन घाटावरील गवत, झुडपे तोडून परिसर स्वच्छ करण्यात आला असून नदीपात्रालगत तात्पुरते बांबूचे संरक्षण कठडे, विजेची व्यवस्था करण्यात येत आहे. तसेच गणेशमूर्ती विसर्जन करण्यासाठी शहरातील मोगलवाडी, हनुमान मंदिर (शिळफाटा), शंकर मंदिर तलाव (वरची खोपोली) या ठिकाणी कृत्रिम तलावांची व्यवस्था करण्यात आली आहे.

**कोरोनाच्या पार्श्वभूमीवर गर्दी टाळण्यासाठी रोट्रॅक्ट क्लब आणि खोपोली नगर परिषद शहरात फिरते विसर्जन तलाव उपलब्ध करून देणार असून गणेशभक्तांनी त्याचा वापर करावा.**
**–गणेश शेटे, मुख्याधिकारी, खोपोली नगर परिषद**



**खोपोली : भाजप नगरसेविका अपर्णा सचिन मोरे यांनी तयार केलेल्या आरती संग्रहाचे प्रकाशन बुधवारी भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी सामाजिक कार्यकर्ते सचिन मोरे व इतर उपस्थित होते.**

# खालापुरात मोफत आरोग्य तपासणी शिबिर



**खालापूर, खोपोली : प्रतिनिधी**

नगरपंचायत हद्दीतील शिरवली आदिवासीवाडीमध्ये बुधवारी (दि. ८) मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार शिबिराचे आयोजित करण्यात आले होते.

खालापूर नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी सुरेखा भणगे शिंदे आणि प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अनिलकुमार शाह यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. आदिवासी भागात मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित केल्याबद्दल डॉ. शाह यांनी समाधान व्यक्त केले.

कोरोना संसर्ग आणि साथीचे आजार याच्या पार्श्वभूमीवर आरोग्य तपासणी गरजेचे होते. त्याला येथील आदिवासी बांधवांनी प्रतिसाद दिल्याने शिबिराचा उद्देश पूर्ण झाला असल्याचे मुख्याधिकारी सुरेखा भणगे शिंदे यांनी या वेळी सांगितले.

डॉ. प्रियांका गायकवाड, डॉ. पियुष गायकवाड, डॉ. महादेव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या या शिबिराचा लाभ ८२ महिला व २० पुरुषांनी घेतला. भाजप खालापूर शहर अध्यक्ष राकेश गव्हाणकर, श्रीकांत खडकबाण, मारूती पवार व अनंता वाघमारे यांनी या शिबिराच्या आयोजनासाठी विशेष सहकार्य केले.

# सालेगावचा एक गाव एक गणपती

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्याच्या सालेगावातील ग्रामस्थ एक गाव एक गणपती ही संकल्पना राबवित आहेत. ही परंपरा गेल्या १०० वर्षांपासून सुरू आहे.

माणगावपासून चार किमी अंतरावर असलेल्या सालेगावच्या पश्चिमेला शिवगणेश मंदिर आहे. नवसाला पावणारा अशी येथील गणपतीची ओळख आहे. म्हणूनच दरवर्षी या गणपतीच्या दर्शनाला मोठ्या प्रमाणात भाविक येतात.

दरवर्षी गणेश चतुर्थीला दुपारी एकनंतर सजविलेल्या पालखीतून मंदिरातील गणेशाची मूर्ती गावातील तलावात शंखनाद व मोरयाच्या गजरात फिरविली जाते. त्यानंतर ही पालखी गावातून फिरविण्यात येते. पालखी मंदिरात गेल्यानंतर आरती होऊन मूर्तीची पुन्हा प्रतिष्ठापना केली जाते. तलावातून पालखी फिरवण्याची प्रथा गेल्या कित्येक वर्षांपासूनची आहे. पालखी सोहळासुद्धा अनेकांसाठी आकर्षणाचा भाग असतो.

ग्रामस्थ वैयक्तिक अथवा सार्वजनिक गणपतीची स्थापना करीत नाहीत, तसे केल्यास त्याच्या घरात अरिष्ट येते अशी येथील ग्रामस्थांची समजूत आहे.



(छाया : सलीम शेख)

# कर्जत भाजपकडून पूरग्रस्तांना टीटीचे इंजेक्शन



(छाया : संतोष पेरणे)

**कर्जत : बातमीदार**

भारतीय जनता पक्षाच्या वैद्यकीय सेलच्या माध्यमातून कर्जत पूरग्रस्तांना टीटीचे इंजेक्शन देण्यात येत आहेत.

उल्हास नदीला आलेल्या पुराचे पाणी कर्जत शहरातील अनेक घरांत घुसून मोठे नुकसान झाले होते. या पूरग्रस्त भागात भाजप वैद्यकीय सेल तर्फे टीटी इंजेक्शन देण्याचे कॅम्प आयोजित केले जात आहेत. वैद्यकीय सेल तालुका संयोजक डॉ. भगवान कराळे, सहसंयोजक राहुल कुलकर्णी आणि आरोग्य कर्मचारी यांच्या देखरेखीखाली आणि भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, भाजप शहराध्यक्ष बळवंत घुमरे, शहर सरचिटणीस प्रकाश पालकर, विजय जिनगरे, रायगड जिल्हा उद्योग आघाडी अध्यक्ष मंदार मेहेंदळे, भाजप महिला मोर्चा जिल्हा सरचिटणीस मृणाल खेडकर, जिल्हा चिटणीस बिनीता घुमरे, शहर अध्यक्ष सरस्वती चौधरी, नगरसेविका स्वामींनी मांजरे, सुमन यादव, समीर सोनी तसेच प्रशांत उगले, मारुती जगताप मनीषा धुमने यांच्या उपस्थितीत हे कॅम्प सुरू आहेत.

कर्जत शहरातील पूरग्रस्त शनिमंदिर परिसरातील ३७, प्रभाग पाचमधील ५४ आणि प्रभाग दोन येथे ९५ नागरिकांना टीटीची इंजेक्शन्स मोफत देण्यात आली.





# गणेशभक्तांच्या प्रवासात वाहतूक कोंडीचे विघ्न

**अलिबाग : प्रतिनिधी**

गणेशोत्सवासाठी कोकणात निघालेल्या गणेशभक्तांच्या प्रवासात वाहतूक कोंडीचे विघ्न आले आहे. गणेशभक्त गुरुवारी (दि. ९) मुंबई-गोवा महामार्गावर रायगड जिल्ह्यात वाहतूक कोंडीत अडकले.

गणेशभक्त कोकणात दाखल होण्यास सुरवात झाली आहे. त्यामुळे मुंबई-गोवा महामार्गावरील वाहनांच्या संख्येत वाढ झाली आहे. गुरुवारी रायगड जिल्ह्यातील खारपाडा, नागोठणे, वाकण, कोलाड, इंदापूर आणि माणगाव या ठिकाणी वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याने वाहतुकीचा वेग मंदावला होता. ठिकठिकाणी पडलेल्या खड्ड्यांमुळेही वाहतुकीत अडथळे निर्माण होत आहे.



नागोठणे ते इंदापूर या पट्ट्यात गुरुवारी अत्यंत धीम्यागतीने वाहतूक सुरू होती. पाच ते सहा किलोमीटरचे अंतर पार करण्यासाठी दोन ते तीन तास लागत आहेत. त्यामुळे रस्त्यांच्या दुतर्फा वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुंबई-गोवा महामार्गावर अवजड वाहनांना बंदी घालण्यात आली आहे, मात्र तरीही अनेक मालवाहतूक करणारे ट्रक, केमिकल वाहक टँकर्स मोठ्या प्रमाणात रस्त्यावर होते. त्यामुळे वाहतूक कोंडीची समस्या अधिकच बिकट होत होती.

## पाली शहरामध्ये वाहनांची प्रचंड गर्दी

**पाली : प्रतिनिधी**

गणेशोत्सवानिमित्त कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांना गुरुवारी (दि. ९) मुंबई-गोवा महामार्गावरील वाकण नाक्यावर वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागले. ही वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी पोलिसांनी बहुसंख्य वाहने पालीमार्गे वळवली. त्यामुळे पाली शहरात वाहनांची प्रचंड गर्दी झाली होती.

**“गणेशोत्सवाच्या खरेदीसाठी पाली बाजारपेठेत गर्दी होत आहे. त्यात मुंबई-गोवा महामार्गावरील वाहने पालीमार्गे वळवल्याने शहरात वाहनांची गर्दी झाली. वाहतूक सुरळीत राहावी यासाठी महत्त्वाच्या नाक्यावर वाहतूक पोलीस कार्यरत आहेत. वाहनांच्या योग्य पार्किंगबाबत पोलिसांकडून सातत्याने नागरिक व व्यापाऱ्यांना आवाहन केले जात आहे. पोलीस व्हॅनची गस्त सुरू आहे. जनतेने पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे.**

**-विजय तायडे, निरीक्षक, पाली पोलीस ठाणे, ता. सुधागड**



(छाया : धम्मशील सावंत)

# विकासकामांचा निधी रायगड जिल्हा परिषदेने अडविला

## वैकुंठ पाटील यांचा पत्रकार परिषदेत आरोप

**पेण : प्रतिनिधी**

आमदार रविशेठ पाटील यांनी विकासकामांसाठी आणलेला निधी अडविण्याचे काम जिल्हा परिषदेच्या माध्यमातून झाले असल्याचा आरोप राजिपचे माजी विरोधी पक्षनेते वैकुंठ पाटील यांनी बुधवारी (दि. ८) पेण येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत केला.

आमदार रविशेठ पाटील यांनी शिर्की रस्त्यासाठी कोणाताच निधी दिला नसल्याचा आरोप शेकापचे जि. प. सदस्य प्रभाकर म्हात्रे यांनी काही दिवसापूर्वी केला होता. त्याचा समाचार वैकुंठ पाटील यांनी या पत्रकार परिषदेत घेतला. या विकासकामाबाबत आपल्याकडे पुरावा प्राप्त झाला असल्याचे सांगून वैकुंठ पाटील यांनी कार्यकारी अभियंता (जि.प.) यांनी दिलेल्या पत्राची प्रत या वेळी सादर केली. एप्रिल



महिन्यापासून सुरू होणारे रस्त्याचे काम अडवून तेथील जनतेला खड्ड्यातून प्रवास करायला लावण्याचे पातक जिल्हा परिषद सदस्यानेच केले असल्याचा आरोप वैकुंठ पाटील यांनी या वेळी केला.

रायगड जिल्हा परिषदेत अनेक वर्षांपासून शेकापची सत्ता असूनसुद्धा प्रभाकर म्हात्रे यांनी वाशी विभागातील या भागाचा विकास केला नाही. आमदार रविशेठ पाटील यांच्याच माध्यमातून या भागात रस्त्यांसह इतर विकासकामे होत आहेत. मात्र या कामांसाठी रविशेठ पाटील यांनी दिलेला आमदार निधी अडविण्याचे काम कोणी केले, हे प्रभाकर म्हात्रे यांनी जनतेला सांगावे, असे वैकुंठ पाटील म्हणाले.

आमदार रविशेठ पाटील यांनी पेण तालुक्याचा विकास करण्याचा ध्यास घेतला असल्याने आमदार निधीतून वडखळ, बोरी, शिर्की, मसद येथील रस्त्यांवर १० लाखांच्या प्रमाणे चार टप्प्यांत ४० लाख रुपये निधी दिला आहे. यामुळे येथील विकासात्मक कामे होत आहेत. शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे असणारे रस्ते आमदार निधीतून चकाचक झाले आहेत, मात्र जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत असणारे काही रस्ते आजही दुरवस्थेत असून त्याकडे लक्ष देण्यासाठी जि.प. सदस्यांना वेळ नाही, असा टोला वैकुंठ पाटील यांनी या वेळी लगावला.

पेण तालुक्यातील वडखळ, शिर्की, वाशी, वढाव, भाल यासह पूर्व विभागातीलही रस्त्यांसाठी आमदार पाटील यांनी या अगोदर कोट्यवधी रुपयांचा निधी देऊन अनेक विकासकामे केली आहेत. वडखळ विभागातील रस्त्यांसाठी आमदार रविशेठ पाटील यांनी डीपीडीसीअंतर्गत पत्रव्यवहार करून त्याला तदर्थ मान्यतासुद्धा मिळवून दिली आहे, मात्र मंजूर कामाचा निधी अडविण्याचा काम ते लोक करीत आहेत. मागच्या अनेक वर्षापासून जि.प. सदस्य म्हणून काम करूनसुध्दा सभापती पद न मिळाल्याने नैराश्येपोटी प्रभाकर म्हात्रे बेताल वक्तव्य करीत असल्याचे वैकुंठ पाटील यांनी सांगितले.

# महाड शहरात वाहतूक कोंडी

**महाड : प्रतिनिधी**

दिवसेंदिवस वाढणाऱ्या वाहनांमुळे महाड शहरात वाहतूक कोंडीला सातत्याने सामोरे जावे लागत आहे. शहर वाहतूक पोलीस केवळ पावत्या फाडण्याचे काम करत आहेत, तर नगरपालिका कर्मचारी बघ्याची भूमिका घेत असल्याने वाहतूक कोंडीचा त्रास सर्वसामान्य नागरिकांना होत आहे.

महाडमध्ये वाढत चाललेली लोकसंख्या आणि त्यातून उद्‌भवणारी वाहतूक समस्या दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. ठोस उपाययोजना नसल्याने शहरातील वाहतुकीचे तीनतेरा वाजत आहेत. शहरातील प्रमुख मार्गालगत अवजड वाहने आणि दुकाने थाटल्याने नेहमीच वाहतूक कोंडी पाहावयास मिळते. महाड

## गाळे रिकामे दुकाने रस्त्यावर



(छाया : महेश शिंदे)

शहरातील छत्रपती शिवाजी मार्ग, महात्मा गांधी मार्ग, सावित्री मार्ग या ठिकाणी रस्त्याच्या दुतर्फा वाहने लावली जात असल्याने वाहतूक कोंडी होते. छत्रपती शिवाजी चौक ते वीरेश्वर मंदिर या मार्गात रस्त्यावर दुतर्फा विक्रेते बसत आहेत. लायन्स क्लबपासून बडोदा बँक आणि परिसर तसेच महावीर या दुकानांसमोर कायम वाहतूक कोंडी होत आहे. शिवाजी चौक ते चवदारतळे हा मार्ग अरुंद असल्याने आणि बँक ऑफ इंडियासमोर केली जाणारी पार्किंग वाहतुकीस अडथळा ठरत आहे.

शहरातील प्रमुख रस्ते, मुख्य बाजारपेठ आणि जोडमार्गावरील दुकानदारांकडून आपल्या दुकानातील सामान रस्त्यावर मांडून विक्री केली जाते. भाजी विक्रेते, फळ विक्रेतेदेखील दुकान गाळा रिकामा ठेवून फळे आणि भाज्या रस्त्यावर मांडून विक्री करत आहेत. हा प्रकार गेली अनेक वर्ष सुरू आहे.

शहरातील वाहतूक नियोजनावर वारंवार पोलीस प्रशासन बैठका घेते. सणासुदीला स्थानिक प्रशासन व्यापारी, शहरातील प्रतिष्ठित नागरिक, राजकीय सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी यांना बोलावून सूचना ऐकून घेतल्या जातात आणि सण शांततेत पार पडले की पुन्हा जैसे थे स्थिती सुरु होते. कागदावर असलेले वाहतुकीचे नियोजन प्रत्यक्षात कृतीत येत नसल्याने शहरात येणारे पर्यटक देखील आश्चर्य व्यक्त करत आहेत.

## लालपरी ठरतेय कोरोना वाहक

**खोपोली : प्रतिनिधी**

प्रवाशांच्या सेवेसाठी असलेल्या एसटी बसमध्ये कोरोनाविषयक नियम पायदळी तुडवले जात आहेत. खोपोली-पनवेल मार्गावर धावणाऱ्या एसटी बसमध्ये प्रवाशांच्या घोळक्यात वाहक आणि चालक विनामास्क वावरत असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे.

खोपोली गावातून पनवेलला जाण्यासाठी दुपारी ४ वाजता सुटलेल्या एसटी (एमएच-०७, सी-७२११) मध्ये क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी भरले होते. त्यातील अनेकांनी मास्क लावले नव्हते. त्यात चालक आणि वाहकाचाही समावेश होता. याच मार्गावर धावणाऱ्या नवी मुंबई परिवहन सेवेचे वाहक विनामास्क प्रवाशांना हटकत असून प्रवास करण्यास मनाई करतात. ही जागरुकता एसटी चालक आणि वाहकांनी दाखविणे गरजेचे आहे.

# मुरूडमध्ये ग्राहकांची तुफान गर्दी

**मुरूड : प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या खरेदीसाठी गुरुवारी मुरूड बाजारपेठेमध्ये ग्राहकांची तुफान गर्दी झाली होती. चाकरमानी बाजारातून खरेदी करून घरी जाताना दिसत होते. मागणी वाढल्याने विशेषत: फळे, फुले भाजीचे दर गगनाला भिडले होते. सजावटीचे साहित्य, किराणा माल, फळे, विद्युत तोरणे आदींचा बाजार तेजीत होता.

गुरुवारी हरितालिका व्रत होते. हरितालिकेसाठी महत्त्वाच्या असलेल्या शहाळ्यांनी मुरूड बाजारपेठ व्यापली होती. एका शहाळ्यासाठी ४० ते ५० रुपये दर लावला जात होता. सफरचंद, मोसंबी, डाळींब यांचे दर सरासरी शंभर ते दोनशे रुपये किलो होते. चांगली केळी ५० रुपये डझनाने घ्यावी लागत होती. तांदूळ, विविध प्रकारच्या डाळी, वाटाणे, शेंगतेल, पामतेल, तसेच विविध कडधान्ये आदींना मोठी मागणी होती.

श्रीगणरायांच्या सजावटीसाठी कापड विक्रेत्यांनी विविध प्रकारचे पडदे उपलब्ध केले असून, त्याची खरेदी ग्राहकांकडून केली जात होती. वीज उपकरणांची दुकाने, भांड्यांच्या दुकानात ग्राहकांची गर्दी होती.

गणरायांच्या आरती आणि भजनानंतर दिल्या जाणाऱ्या प्रसादासाठी सफरचंद, केळी, चिबूड, काकडी, पेढे, लाडू, मोडक आदींची खरेदी चाकरमान्यांकडून सुरू होती.

मुरूड बाजारपेठेत ग्राहकांची गर्दी झाल्याने वाहनांना पुढे जाण्यासाठी खूप वेळ लागत होता. या गर्दीमध्ये कोरोनाविषयक नियमांकडे सर्वांचेच दुर्लक्ष झाले होते.

(छाया : संजय करडे)



# रोहा बाजारपेठेत साहित्य खरेदीसाठी नागरिकांची झुंबड

**रोहे : प्रतिनिधी**

गणेशोत्सवाला आजपासून सुरुवात होत आहे. या उत्सवासाठी लागणाऱ्या सर्व साहित्याच्या खरेदीसाठी रोहा बाजारपेठेत गुरुवारी (दि. ९) नागरिकांची तुडुंब गर्दी झाली आहे. या गर्दीत कुठेही कोरोनाचे नियम पाळले जात नसल्याचे दिसून आले आहे.

गणेशोत्सवासाठी रोहा तालुक्यात चाकरमानी मोठ्या प्रमाणात आले आहेत. रोहा ही तालुक्याची मुख्य बाजारपेठ आहे. तालुक्यातील मेढा, यशवंतखार, चणेरा, घोसाळे, खांब, देवकाने, धाटाव, भालगाव, विरजोली, तांबडी या गावांसह नागोठणे, कोलाड या भागातील नागरिक गणेशोत्सवाच्या खरेदीसाठी आल्याने रोहा बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात गर्दी दिसून आली.

(छाया : महादेव सरसंबे)



रोहा बाजारपेठ ही गणेशोत्सवाच्या साहित्याने फुलली असून हे साहित्य खरेदी करण्यासाठी नागरिकांची झुंबड उडाली आहे. गणरायासमोर ठेवण्यासाठी लागणारी फळे व अन्य प्रसादाचे साहित्य घेण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती. डेकोरेशन साहित्य, विद्युत रोषणाईसाठीचे साहित्य, मखर खरेदी करण्यासाठी गणेशभक्त बाजारात मोठ्या प्रमाणात आले होते. त्यामुळे रोहा बाजारपेठेतील सर्वच रस्ते आज गजबजलेले दिसून आले. शहरातील तीनबत्ती नाका, एसटी स्टँड परिसर, नगरपालिका कार्यालयासमोरील चौक, वीर सावरकर रोड आदी ठिकाणी अधूनमधून वाहतूक कोंडी होत होत होती.

कोरोनाची दुसरी लाट ओसरत असली तरी तिसऱ्या लाटेची शक्यता वर्तवली जात आहे, मात्र गुरुवारी बाजारपेठेतील गर्दीत बहुसंख्य नागरिक विनामास्क वावरत असल्याचे दिसून आले.


**PUNJAB CONWARE**
**(O&M GAD LOGISTICS PVT. LTD.)**
Plot No. – 2A, Sector -2, Dronagiri Node , Tal- Uran, Dist – Raigad, Maharashtra – 400707, India

**Auction Sale : Waste Shred Paper**

M/s. Punjab Conware O&M GAD Logistics India Pvt. Ltd. is conducting the General Auction of above cargo through Tender Auction (through E-mail due to COVID protocol). Valid CPCB/SPCB License required.

Mail id : Info@gadlogistics.com

On ‘AS IS WHERE IS BASIS’

Tender Auction Through email on 16/09/2021
time 10:30 A.M. to 11:30 A.M.
Mail received after 11:30 A.M. will not be considered.
EMD – INR 100,000/- (DD Only)
Inspection on – 11/09/2021 to 15/09/2021



सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
रायगड विभाग रायगड
जा.क्र. न्याय शाखा/११६३/२१
दि. ८/९/२०२१

**चौकशीची जाहीर नोटीस**

अर्ज क्रमांक :- २८३/२०२१
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्र. :- **''श्रावणी गावडे चॅरिटेबल ट्रस्ट''...बाबत**
**सौ. मेघा महेश गावडे** ...... अर्जदार

सर्व सबंधित लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की,

सहाय्यक धर्मादाय आयुक्त, रायगड विभाग रायगड हे वर नमूद केलेल्या नोंदणी अर्ज यासबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत :-

**(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?**
**(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?**
**(अ) जंगम मिळकत :- (वर्णन)** रोख रक्कम - १०००/- रुपये
**(ब) स्थावर मिळकत :- (वर्णन)** --------- काही नाही

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून **तीस** दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मी सहाय्यक धर्मादाय आयुक्त, रायगड अलिबाग यांचे शिक्यानिशी आज **दिनांक /०९/२०२१** रोजी दिली.

शिक्का

**सही/-**
**(सौ. अंजली रमेश पिसाळ)**
अधीक्षक,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
रायगड विभाग, रायगड

# टी-२० वर्ल्डकपसाठी टीम इंडियाची घोषणा

**मुंबई : वृत्तसंस्था**

आगामी टी-२० वर्ल्डकप २०२१ स्पर्धेसाठी टीम इंडियाची घोषणा करण्यात आली आहे. भारतीय निवड समितीने मुंबईत संघाची घोषणा केली आणि मोठी बातमी म्हणजे माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनीला संघाचे मेंटॉर म्हणजे मार्गदर्शक बनवण्यात आले आहे. शिवाय फिरकीपटू आर. अश्विनलाही तबब्ल चार वर्षानंतर भारताच्या टी-२० संघात संधी देण्यात आली आहे. वर्ल्डकप स्पर्धेसाठी टीम इंडियात कोणते खेळाडू असणार याकडे सर्वांचेच लक्ष होते, पण धोनीचीही निवड झाली आणि नेटकऱ्यांनी सोशल मीडियावर जल्लोष केला. धोनीच्या धूर्त रणनितीचा उपयोग टीम इंडियाला लाभणार असल्याने चाहतेही सुखावले आहेत.



धोनी आणि विराटची जोडी वर्ल्डकप गाजवणार आणि रोहित-विराट-धोनीचे एकत्रिकरण पाहायला मिळणार, अशा पद्धतीच्या प्रतिक्रिया सोशल मीडियावर समोर आल्या आहेत. या संघात अक्षर पटेल, वरुण चक्रवर्ती, राहुल चहर, इशान किशन सारख्या युवा खेळाडूंनाही स्थान देण्यात आले आहे. दुसरीकडे, श्रेयस अय्यर, दीपक चहर आणि शार्दुल ठाकूर यांना राखीव खेळाडूंमध्ये ठेवण्यात आले आहे. पृथ्वी शॉ, शिखर धवन आणि कृणाल पंड्या यांना संघात स्थान मिळवता आलेले नाही. एवढेच नव्हे, तर लेगस्पिनर यजुर्वेंद्र चहलची देखील टी-२० वर्ल्डकप संघात निवड झालेली नाही. भारताच्या संघात चार फलंदाज, दोन यष्टीरक्षक-फलंदाज, १ जलदगती अष्टपैलू, २ फिरकी अष्टपैलू, ३ फिरकीपटू व ३ जलदगती गोलंदाज असणार आहेत.

भारतीय संघ - विराट कोहली, रोहित शर्मा, लोकेश राहुल, सूर्यकुमार यादव, रिषभ पंत, इशान किशन, हार्दिक पांड्या, रवींद्र जडेजा, राहुल चहर, आर अश्विन, अक्षर पटेल, वरुण चक्रवर्थी, जसप्रीत बुमराह, भुवनेश्वर कुमार, मोहम्मद शमी; राखीव खेळाडू - श्रेयस अय्यर, शार्दूल ठाकूर व दीपक चहर

### कॅप्टन कूल धोनीकडे मोठी जबाबदारी

भारताचा माजी कर्णधार महेंद्रसिंग धोनी टीम इंडियाला मार्गदर्शन करणार आहे. तो मेंटर म्हणून भारतीय संघासोबत असणार आहे, अशी घोषणा बीसीसीआयचे सचिव जय शाह यांनी केली. 'दुबईत मी महेंद्रसिंग धोनीसोबत चर्चा केली. ही जबाबदारी पार पाडण्यास त्याची काहीच हरकत नाही आणि ट्वेंटी-२० वर्ल्ड कप स्पर्धेत टीम इंडियाचा मेंटर म्हणून काम पाहण्यात तो तयार आहे. याबाबत मी कर्णधार विराट कोहली, उप कर्णधार रोहित शर्मा आणि मुख्य प्रशिक्षक रवी शास्त्री यांच्यासोबतही बोललो आणि त्यांनाही हा निर्णय पटलेला आहे,' असे जय शाह यांनी सांगितले.

## आरोग्य प्रहर

### आलेपाण्याचे आश्चर्यकारक फायदे

साधारणपणे भारतीय घरांमध्ये आले वापरले जाते. आपण ते आपल्या चहामध्ये किंवा जेवणात वापरतो. आपल्या पदार्थांना चव देण्याव्यतिरिक्त, आयुर्वेद आणि होमिओपॅथीसारख्या वैद्यकीय शास्त्रांमध्ये आले पारंपरिकपणे वापरले जाते. याचे अनेक आरोग्य फायदे आहेत. आले हे अँटीऑक्सिडंट आणि विरोधी दाहक गुणधर्मांचे एक पॉवरहाऊस आहे जे आपल्या त्वचेसाठी, केसांसाठी आणि शरीरासाठी फायदेशीर आहे.



**वजन कमी करण्यासाठी-** आले हे केवळ एक उत्तम चव वाढवणारेच नाही तर वजन कमी करण्यासाठी एक उत्तम पर्याय म्हणून देखील कार्य करते. जर तुम्ही नियमितपणे आले पाणी प्याल तर ते पोषकद्रव्ये अधिक चांगल्या प्रकारे शोषून घेते. त्यामुळे तुमची भूकही कमी होते. ते सेवन केल्यावर तुम्हाला बराच वेळ भूक देखील लागत नाही.

**त्वचेसाठी चांगले-** आलेपाण्याने त्वचेच्या समस्या दूर होण्यास मदत होते. त्यात अँटिऑक्सिडेंट जिंजरॉल आहे. हे केवळ त्वचा निरोगी ठेवत नाही तर ते चमकदार होण्यास मदत करते. त्याचे दाहक-विरोधी गुणधर्म सर्व प्रकारच्या संसर्गाशी लढू शकतात आणि आपली त्वचा निरोगी करू शकतात.

**मासिक पाळीमधील त्रास कमी होतो-** पीएमएसमुळे होणारी अस्वस्थता कमी करण्यासाठी तुम्ही आले पाणी पिऊ शकता. एका संशोधनानुसार आले मासिक पाळीतील वेदना आणि पेटके कमी करण्यास मदत करते.

**कोलेस्टेरॉलची पातळी कमी करते-** आले पाणी खराब कोलेस्टेरॉलची पातळी कमी करते. हृदयरोग आणि स्ट्रोक सारख्या आरोग्य समस्यांचा वाढता धोका कमी करते.


**आल्याच्या पाण्यामध्ये अँटिऑक्सिडंट्-** आल्याचे पाणी अँटीऑक्सिडंट्सने भरलेले असते. जे तुम्हाला मुक्त रॅडिकल्सचा सामना करण्यास मदत करते. कर्करोग, हृदयरोग आणि मधुमेह यासारख्या आरोग्याच्या परिस्थितीचा धोका कमी करते. आल्याच्या पाण्यामध्ये पोटॅशियम भरपूर असते. पोटॅशियम आपल्या हृदयासाठी, स्नायूंसाठी, हाडे आणि चयापचयासाठी महत्त्वाचे आहे.

**घरी आले पाणी कसे बनवायचे?**

साहित्य- ताजे आले, पाणी ३ कप, मध १ चमचा

आले किसून घ्या. एका भांड्यात ठेवा. ३ कप पाणी उकळा. पाणी उकळल्यावर त्यात आले घाला. गॅस बंद करा आणि ५ मिनिटे पाणी असेच राहू द्या. एक चमचा मध घालून चांगले मिक्स करा. आले पाणी पिण्यासाठी तयार आहे.

## लवकरच सौरव गांगुलीचा बायोपिक मोठ्या पडद्यावर



**मुंबई : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट इतिहासातील एक यशस्वी कर्णधार, उत्कृष्ट दर्जाचा डावखुरा फलंदाज, आपल्या जोशपूर्ण खेळीने प्रतिस्पर्ध्यांना गारद करून सहकाऱ्यांचा आत्मविश्वास वाढवणारा खेळाडू म्हणजे सौरव गांगुली. त्याच्या जीवनाला मोठ्या पडद्यावर पाहण्यासाठी सर्वजण उत्सुक आहेत, पण याबाबतची कोणतीच नेमकी माहिती आतापर्यंत समोर आली नव्हती. काही दिवसांपूर्वी गांगुलीने स्वतः वृत्तसंस्थेशी बोलताना आपण आपल्या क्रिकेट जीवनावर बायोपिक करण्यास होकार दिला असल्याची माहिती दिली होती. त्यानंतर आज त्याने ट्विट करत नेमके कोण हा चित्रपट बनवणार आहे तेही जाहीर केले आहे.

गांगुलीने ट्विटमध्ये लिहिले आहे की, क्रिकेट हे माझे आयुष्य आहे. मला आयुष्यात सर्व आत्मविश्वास हा क्रिकेटमुळे मिळाला. मी ताठ मानेनं पुढे जाऊ शकलो तेही क्रिकेटमुळेच. आता माझ्या आयुष्यावरील चित्रपट लव फिल्म्स मोठ्या पडद्यावर आणणार आहेत. याचा मलाही फार आनंद आहे.

## ऑस्ट्रेलिया क्रिकेटचा तालिबानला इशारा

**मेलबर्न : वृत्तसंस्था**

अफगाणिस्तानचा ताबा मिळवल्यानंतर तालिबानने महिला खेळाडूंवर बंदी घालण्याचे जाहीर केले आहे. दरम्यान, क्रिकेट ऑस्ट्रेलियाने या निर्णयाचा विरोध केला असून अफगाणिस्तानात महिला क्रिकेटला समर्थन दिले नाही, तर पुरुष क्रिकेट संघासोबत होणारा प्रस्तावित सामना खेळणार नाही, असा इशाराच दिला आहे. तालिबानच्या सांस्कृतिक आयोगाचे उपप्रमुख अहमदुल्लाह वासिक यांनी अफगाणिस्तानमधील महिलांना क्रिकेट सहित अन्य खेळांमध्ये भाग घेता येणार नाही असे जाहीर केले आहे. अहमदुल्लाह वासिक यांनी स्थानिक माध्यमांशी संवाद साधतांना ही माहिती दिली आहे.

मला वाटत नाही की महिलांना क्रिकेट खेळण्याची परवानगी दिली जाईल, कारण महिलांनी क्रिकेट खेळणे इतके गरजेचे नाही, असे अहमदुल्लाह वासिक यांनी म्हटले होते. क्रिकेटमध्ये कदाचित त्यांना आपला चेहरा आणि शरीर झाकता येणार नाही अशी परिस्थिती निर्माण होऊ शकते. इस्लाममध्ये महिलांना अशा पद्धतीने सर्वांसमोर जाण्याची परवानगी नाही, असेही ते म्हणाले होते.

हे मीडियाचे युग असून त्यांचे फोटो, व्हिडीओ समोर येतील जे लोक पाहतील. इस्लाममध्ये महिलांना क्रिकेट खेळण्याची किंवा शरीर दिसेल असा कोणताही खेळ खेळण्याची परवानगी नाही, असे यावेळी त्यांनी सांगितले होते.


तालिबानने पुरुष क्रिकेट संघाच्या दौऱ्यात कोणताही अडथळा येणार नाही असे जाहीर केले होते. तसेच क्रिकेट ऑस्ट्रेलियानेही २७ नोव्हेंबरला होणारा प्रस्तावित सामना पार पडेल अशी अपेक्षा व्यक्त केली होती, मात्र गुरुवारी क्रिकेट ऑस्ट्रेलियाने महिला क्रिकेटची प्रगती होणे जागतिक स्तरावर महत्त्वाचे असल्याचे मत व्यक्त केले आहे.क्रिकेट हा सर्वांसाठी खेळ आहे हेच आमचे व्हिजन असून आणि आम्ही प्रत्येक स्तरावर महिलांसाठी या खेळाचे निर्विवाद समर्थन करतो, असे क्रिकेट ऑस्ट्रेलियाने म्हटले आहे.

जर मीडियामध्ये आलेल्या वृत्तांनुसार, अफगाणिस्तानात महिला क्रिकेटला समर्थन देण्यात येणार नसल्याचे वृत्त खरे असेल, तर क्रिकेट ऑस्ट्रेलियाकडे पुरुष संघासोबतचा प्रस्तावित सामना रद्द करण्याशिवाय दुसरा कोणता पर्याय नसेल, असे स्पष्ट सांगण्यात आले आहे.

## यूएस ओपन : लैलाचा एलिनाला पराभवाचा धक्का

**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

कॅनडाची बिगरमानांकित युवा खेळाडू लैला ॲनी फर्नांडिझने अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेतील धक्कादायक निकालांची मालिका सुरू ठेवली आहे. १९ वर्षीय फर्नांडिझने उपांत्यपूर्व फेरीत पाचव्या मानांकित एलिना स्विटोलिनाला पराभूत केले. द्वितीय मानांकित आर्यना सबालेंका आणि पुरुषांमध्ये फेलिक्स ऑगर-अलिसीमे या खेळाडूंनी अपेक्षित विजयांसह आगेकूच केली.



लैलाने महिला एकेरीतील उपांत्यपूर्व फेरीच्या लढतीत युक्रेनच्या स्विटोलिनाला ६-३, ३-६, ७-६ (७-५) असे पराभूत केले. अमेरिकन ग्रँडस्लॅम टेनिस स्पर्धेची उपांत्य फेरी गाठणारी ती मारिया शारापोव्हानंतर (२००५) सर्वात युवा खेळाडू ठरली. लैलाने यंदाच्या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करताना गतविजेत्या नाओमी ओसाका आणि २०१६च्या विजेती अँजलिक कर्बरचा पराभव केला. त्यापाठोपाठ तिने स्विटोलिनाला धूळ चारली.

अन्य लढतींत, सबालेंकाने आठव्या मानांकित बाबरेरा क्रेजिकोव्हावर ६-१, ६-४ अशी सरळ सेटमध्ये मात केली. उपांत्य फेरीत सबालेंका आणि लैला आमने-सामने येतील. पुरुष एकेरीत स्पेनच्या कार्लोस अल्कराझने दुखापतीमुळे माघार घेतल्याने २१ वर्षीय ऑगर-अलिसीमेला पहिल्यांदा ग्रँडस्लॅम स्पर्धेची उपांत्य फेरी गाठण्यात यश आले. उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात अल्कराझ ३-६, १-३ असा पिछाडीवर होता. त्यानंतर दुखापतीमुळे त्याला सामन्यात पुढे खेळता आले नाही.

### मेदवेदेव उपांत्य फेरीत

दुसऱ्या मानांकित डॅनिल मेदवेदेवने अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेत विजयी घोडदौड कायम राखली. त्याने हॉलंडच्या बोटिक व्हॅन डी झँडशूल्पचा ६-३, ६-०, ४-६, ५-७ असा पराभव करत उपांत्य फेरीत प्रवेश केला. मेदवेदेवला यंदा ऑस्ट्रेलियन खुल्या टेनिस स्पर्धेच्या अंतिम फेरीत नोव्हाक जोकोव्हिचने पराभूत केल्याने त्याचे पहिल्या ग्रँडस्लॅम जेतेपदाचे स्वप्न भंगले होते. अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेत मात्र मेदवेदेव्ह जेतेपदापासून केवळ दोन विजय दूर असून पुढील फेरीत त्याच्यासमोर ऑगर-अलिसीमेचे आव्हान असेल.




## बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये भारताचा दिमाखदार प्रारंभ

### इजिप्त, स्वीडनचा पराभव, तर फ्रान्सशी बरोबरी

**चेन्नई : वृत्तसंस्था**

संयुक्त गतविजेत्या भारतीय संघाने 'फिडे' ऑलिम्पियाड बुद्धिबळ स्पर्धेच्या अभियानाला दिमाखदार प्रारंभ करताना पहिल्या तीन लढतींमध्ये अपराजित राहण्याची किमया साधली. अव्वल विभागातील 'ब' गटात समाविष्ट असलेल्या भारताने स्पर्धेच्या पहिल्या दिवशी इजिप्तचा ६-० असा धुव्वा उडवला, स्वीडनला ४-२ असे पराभूत केले, तर फ्रान्सविरुद्धचा सामना ३-३ असा बरोबरीत सोडवला.

इजिप्तविरुद्ध सलामीच्या लढतीत सर्व खेळाडूंना आपापले सामने जिंकण्यात यश आल्यामुळे भारताने ६-० अशा मोठ्या फरकाने विजय मिळवला. पुरुषांमध्ये माजी विश्वविजेत्या विश्वनाथन आनंदने अहमद आदलीचा, तर बी. अधिबानने अधम फावझीचा पराभव केला. महिला गटात तानिया सचदेव आणि भक्ती कुलकर्णीने अनुक्रमे शाहेंदा वफा आणि अयाह मोअताझला पराभूत केले, तसेच युवा गटात आर. प्रज्ञानंदने अदहम कांदील, तर आर. वैशालीने सारा आदिलचा पराभव केला.

दुसऱ्या लढतीत भारताला फ्रान्सने ३-३ असे बरोबरीत रोखले. तिसऱ्या लढतीत भारताने स्वीडनला ४-२ असे नामोहरम केले.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com